सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२३ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## प्रियंका गांधी यांनी वायनाड येथून भरला उमेदवारी अर्ज, काँग्रेसकडून जोरदार शक्तिप्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३वायनाड**

वायनाड लोकसभा मतदारसंघामध्ये होत असलेल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांच्यासह काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी वायनाडमध्ये काँग्रेसकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. तसेच प्रियंका गांधी यांनी रोड शो करत वायनाडमधील मतदारांना अभिवादन केले.



काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीत रायबरेली आणि वायनाड अशा दोन लोकसभा मतदारसंघांमधून विजय मिळाल्यानंतर वायनाडमधील खासदारकीचा राजीनामा दिला होता. त्यामुळे या मतदारसंघातील जागा रिक्त झाली होती. तिथे काँग्रेसकडून प्रियंका गांधी यांना उमेदवारी घोषित करण्यात आली होती. दरम्यान, आज प्रियंका गांधी यांनी रोड शो च्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रियंका गांधी यांच्या रोड शोमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी हे नेते उपस्थित होते. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी सकाळी ११ वाजता कलपेट्टा न्यू बस स्टँड येथून रोड शो ला सुरुवात केली. या रोड शोनंतर प्रियंका गांधी यांनी सभेला संबोधित केले.

यावेळी प्रियंका गांधी म्हणाल्या की, मागच्या ३५ वर्षांपासून मी वेगवेगळ्या निवडणुकांसाठी प्रचार करत आहे. आता मी पहिल्यांदाच तुमच्या पाठिंब्याची मागणी करण्यासाठी इथे आले आहे. ही एक वेगळी जाणीव आहे. मला वायनाड येथून निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारी दिल्याबद्दल मी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे आभार मानते.

## लॉरेन्स बिश्नोईच्या टार्गेटवर राहुल गांधी आणि ओवैसी, जीवे मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३वाराणसी**

काही दिवसापूर्वी मुंबई माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांची हत्या करण्यात आली. या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोईची टोळी पुन्हा चर्चेत आली. दरम्यान, आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि एमआयएमचे नेते ओवैसी यांना सोशल मीडियावरुन धमकी आली आहे. लॉरेन्स बिश्नोईच्या फोटोसह ही धमकी फेसबुकवर शेअर करण्यात आली असून या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांनी वाराणसीतील सिगरा पोलिस ठाण्यात




याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. एनएसयूआयने सोशल मीडिया वापरकर्त्याविरुद्ध तत्काळ एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे. या पोस्टमध्ये राहुल गांधी यांच्यासह एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्याही नावाचा उल्लेख आहे.

एनएसयूआय पूर्व उत्तर प्रदेशचे अध्यक्ष ऋषभ पांडे यांनी सांगितले की, बुद्धादित्य मोहंती नावाच्या वापरकर्त्याने खासदार राहुल गांधी यांच्याबद्दल सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे, यामध्ये त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासोबतच लॉरेन्स बिश्नोईचा फोटो पोस्टमध्ये दिला आहे.

एनएसयूआयच्या कार्यकर्ते म्हणाले, राहुल गांधी प्रत्येक विभागातील लोकांना सोबत घेत आहेत, संविधानाच्या रक्षणाबद्दल बोलत आहेत आणि अशा परिस्थितीत ते देशाची सर्वात मोठी आशा आहेत. त्यांच्याविरोधात असा विचार आम्ही कदापि खपवून घेणार नाही. एफआयआर व्हावी, अशी आमची मागणी आहे. या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करा.

## राज ठाकरेंच्या उमेदवारांना भाजप पाठिंबा देणार? बाळा नांदगावकरांचे महत्वाचे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी रात्री अमित ठाकरेंसह मुंबई, राज्यभरातील उमेदवारांची यादी जाहीर केली. मुंबईतील माहिम मतदारसंघातून अमित ठाकरे निवडणूक लढणार आहेत. याठिकाणी शिंदे सेनेच्या तगड्या उमेदवारासोबत अमित ठाकरेंना दोन हात करावे लागणार आहेत. उद्धव ठाकरे उमेदवार देतात की नाही यावरून या मतदारसंघातील बरीच समीकरणे अवलंबून आहेत. अशातच राज ठाकरेंनी जशी भाजपाला बिनशर्त पाठिंबा देत मदत केलेली तशी आता भाजपा करणार का, असाही प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.

विधानसभेला राज ठाकरेंच्या उमेदवारांना भाजपा पाठिंबा देणार का, या प्रश्नावर मनसे नेते



बाळा नांदगावकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे यांनी त्यांचे निवडून आलेले आमदार त्यात केवळ संदिपान भुमरे सोडून सगळ्यांना त्यांनी उमेदवारी दिली आहे. यामुळे आमच्यात मैत्रीपूर्ण लढतीची काही चर्चा झालेली नाही. तसेच भाजपा पाठिंबा देणार की नाही हा त्यांचा प्रश्न आहे. राज ठाकरे दिलदार व्यक्ती आहेत, असे नांदगावकर यांनी स्पष्ट केले आहे.

## आम्ही भटके विमुक्त जमातीचे, कुणी मतदान मागायला येऊ नका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

भटक्या विमुक्त जमातीच्या वस्तीमध्ये सध्या झळकत असलेल्या बॅनरने या समाजाची खदखद दिसून येत आहे. साधे जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही, मग योजनांचा लाभ मिळणे तर शेकडो मैल दूर आहे, अशी भावना मांडत आमच्या वस्तीत कुठल्याही राजकीय पक्षाने मतदान मागायला येऊ नये, अशी खदखद वस्तीच्या नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विदर्भातील भटक्या विमुक्त जमातीच्या अशा अनेक वस्त्यांमध्ये असे बॅनर लावण्यात आल्याची माहिती आहे. साहेब आम्ही भारतीय आहोत आणि भटक्या विमुक्त जमाती मध्ये येतो. या जमातीकडे कोणतीही जमीन नाही, त्यामुळे महसूल पुरावा कोठून आनणार? आजोबा, पणजोबा, वडील यांनी कधी शिक्षण घेतले नाही, मग त्यांच्या जातीची नोंद कोठून आणावी, अशी उद्विग्नता या वस्त्यांमधील नागरिकांनी व्यक्त केली. आता मुलं मोठी झाली, शिकायला लागली, त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा, आम्हला घरकुल मिळावे, यासाठी सर्वत्र जातीचे प्रमाणपत्र मागितले जातात. यासाठी अनेकदा जिल्हाधिकारी, तहसीलदार, आमदार, खासदार, नगरसेवक, समाजकल्याण अधिकारी यांचे उंबरठे चालून चप्पल झिजले आहेत, तरी प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यामुळे आमची जात कोणती ते तरी ठरवून दया आणि त्याचे प्रमाणपत्र दया, अशी आर्त मागणी सर्व भटके विमुक्त जमातीच्या लोकांनी केली आहे.

## फडणवीसांनी माळी समाजाला दिलेला शब्द फिरविला

### समाज बांधव संतप्त-धडा शिकविण्याचा केला निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अचलपूर**

अमरावती जिल्ह्यात माळी समाजाचे मोठे प्राबल्य असले तरी या समाजाची विविध राजकीय पक्षांनी कायम राजकीय उपेक्षाच केली आहे.असे असतांना देखील माळी समाज हा भाजपच्या मागे खंबीरपणे उभा राहिला.परंतु २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मात्र अमरावती जिल्ह्यातील अचलपूर किंवा मोर्शी वरूड मतदार संघात माळी समाजाला प्रतिनिधित्व देण्यात येईल असा शब्द भाजप नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता .परंतु अचलपूर मतदारसंघातून प्रवीण तायडे सारख्या नवख्या उमेदवाराला उमेदवारी देत फडणवीस यांनी शब्द फिरविल्याने माळी समाज बांधव संतप्त झाले असून या निवडणुकीत भाजपला धडा शिकवण्याचा निर्धार जिल्ह्यातील माळी समाज बांधवांनी केल्याची माहिती समाजातील वरिष्ठ नेत्यांनी दिली आहे. भाजपने गेल्या काही वर्षांपूर्वी विनायकराव कोरडे यांच्या रूपाने माळी समाजाला प्रतिनिधित्व दिले होते .परंतु त्यानंतर मात्र पक्षाने कायमच या पक्षाची राजकीय उपेक्षा करीत राजकीय वाटा देण्यात टाळाटाळ केली. अचलपूर व मोर्शी वरुड मतदारसंघात माळी समाजाचे मोठे प्राबल्य असून या ठिकाणी या समाजाचा उमेदवार दिल्यास त्याच्या विजयाची खात्री असते ही बाब लक्षात घेता गेल्या दोन महिन्यापूर्वी माळी समाजाच्या एका शिष्टमंडळाने भाजपचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपली मागणी त्यांच्या पुढ्यात ठेवली होती. सर्व बाबींचा विचार करता फडणवीसांनी माळी समाजाला निश्चित प्रतिनिधित्व देण्याचा शब्द देत कामास लागण्याच्या सूचना केल्या होत्या. हमखास शब्द मिळाल्याने माळी समाजातील सुधीर रसे, प्रमोद कोरडे,डॉ. उभाड यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी सुरू केली होती. या निवडणुकीत संपूर्ण माळी समाज हा भाजप सोबत राहील व मोठ्या प्रमाणात यश मिळेल अशी परिस्थिती असताना अचानक राजकीय कुटनितीस प्रारंभ होऊन माळी समाजाला कुठल्याही परिस्थितीत उमेदवारी मिळू नये असा कट रचल्या गेला. लोकसभा निवडणुकीतील पराभव जिव्हारी लागल्याने जिल्ह्यातील भाजप संपवायला निघालेल्या धूर्त व चाणाक्ष राणांनी पाटीलकी मिरविणाऱ्या भाजप जिल्हाध्यक्षांना हाताशी धरून चक्क नवखा उमेदवार देत काँग्रेसच्या उमेदवाराला पुढे घेऊन जाण्याची राजकीय चाल खेळली. राणांची ही धूर्त चाल भाजपला डुबविण्याची पहिली पायरी असल्याचे बोलल्या जात असून आज अचलपूर मतदार संघातील परिस्थिती भाजप विरोधी असल्याचे दिसत आहे. प्रतिनिधित्व देण्याचा शब्द देत



### आता तलवार म्यान नाही



अचलपूर विधानसभा मतदार संघात माळी समाजाचे प्राबल्य आहे.यावेळी माळी समाजाचे मते ही निर्णायक असून समाजाने दबाव टाकल्यामुळे आता माळी समाजाचे नेते सुधीर रसे यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज उचलून या निवडणुकीत लढण्याचा निर्धार पक्का केला आहे.त्यामुळे भाजपला एकप्रकारे आव्हान देत आता तलवार म्यान नाही असा संदेश सुधीर रसे यांनी दिलेला आहे.सुधीर रसे यांनी अखेरपर्यंत आपली उमेदवारी कायम ठेवल्यास भाजपला मोठा फटका बसण्याची दाट शक्यता असून माळी समाजाने यामाध्यमातून आपली ताकद दाखवून देण्याचा निश्चय केला असल्याचे दिसून येते.

ऐनवेळी तो शब्द फिरविणारे देवेंद्र फडणवीस यांच्या कृतीने संपूर्ण माळी समाज संतप्त झाला असून या संदर्भात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.गेल्या अनेक वर्षापासून समाजाची बांधणी करीत व पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या निष्ठावंत इच्छुकांना या सर्व घटनेने मोठा राजकीय धक्का बसला असून हा समाजाचा अपमान असल्याचा सूर उमटत आहे.शब्द फिरविणाऱ्या पक्षाला तसेच विशिष्ट समाजाच्या नवख्या आणि डमी उमेदवाराला पर्यायाने धूर्त राजकारणी चाल खेळणाऱ्या राणा,बोंडे या जोडगोडीला धडा शिकविण्याचा निर्धार जिल्ह्यातील माळी समाज बांधवांनी केला असल्याची विश्वसनीय माहिती आहे.दरम्यान जिल्ह्यातील माळी समाजाला दिलेला शब्द अचानक फिरवीत एक प्रकारे समाजाचा अपमान केल्याची भावना माळी समाज बांधवांमध्ये निर्माण झाली असून याचा मोठा परिणाम विधानसभा निवडणुकीच्या निकालावर पडेल असा दावा माळी समाजाच्या नेत्यांनी केला आहे.

**माळी समाजाला संपवण्याचा घाट**

अमरावती जिल्ह्यात प्राबल्य असलेल्या माळी समाजाला राजकीय दृष्ट्या संपविण्याचा घाट काही धूर्त राजकारण्यांनी घातला असून अशा राजकारण्यांनी त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याचा निर्धार माळी समाज बांधवांनी केल्याचे समजते.

**भाजपने ओढवून घेतला अन्य समाजाचा रोष**

राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या असलेल्या अचलपूर मतदार संघात भाजपने ऐनवेळी खेळलेल्या राजकीय चालीमुळे बारी, तेली, व अन्य हिंदी भाषिक समाजाचा देखील रोष ओढवून घेतल्याचे दिसत आहे.या मतदार संघातून बारी समाजाचे नेते जि.प. चे माजी सभापती मनोहर सुने,हिंदी भाषिक नेते प्रमोदसिंह गडरेल यांनी देखील भाजपकडे उमेदवारीची मागणी करीत तयारी केली होती.पण भाजप श्रेष्टींनी धूर्त नेत्यांच्या राजकीय दबावाला बळी पडून निष्ठावंतांऐवजी नवखा व डमी उमेदवार दिल्याने अन्य समाज व त्यांचे नेते नाराज झाले असून याचा मोठा फटका भाजपला अचलपूरच नव्हे तर जिल्ह्यातील सर्वात मतदार संघात बसेल अशी एकंदर परिस्थिती आहे.

## माय मराठीचा झेंडा अटकेपार; प्राथमिक मराठी भाषेचा अभ्यासक्रम ऑक्सफर्ड विद्यापीठात सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मुंबई**

विश्वविख्यात ऑक्सफर्ड विद्यापीठात पहिल्यांदाच मराठी भाषेचे धडे दिले जाणार आहेत. विद्यापीठातील आशियाई आणि मध्यपूर्व अभ्यास विभागाने मराठी भाषेचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला असून, या अभ्यासक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना मराठी शिकण्याची संधी मिळणार आहे.

गेल्या वर्षीपासून हिंदी शिकवायला सुरुवात केली आणि माझी मराठी शिकवण्याची आवडही व्यक्त केली होती. गेल्या शैक्षणिक वर्षात मला विद्यापीठातील एका वाचन गटाला संत बहिणाबाईंची गाथा या १७व्या शतकातील ग्रंथाबाबत मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. तेव्हा आम्ही विद्यापीठात मराठी शिकवण्याचा विचार मांडला होता. सुदैवाने या वर्षी काही विद्यार्थ्यांना हिंदी व्यतिरिक्त



दुसरी भारतीय भाषा शिकायची होती आणि त्यांना मराठी शिकण्यात रस होता. त्यामुळे आम्ही मराठीचा अभ्यासक्रम शिकविण्याचा निर्णय घेतला असं येथील प्राध्यापक अश्विनी मोकाशी म्हणाल्या. याविषयी इंडियन एक्सप्रेस या दैनिकाने वृत्त छापलं आहे.

या पूर्वी कधी ऑक्सफर्ड विद्यापीठात मराठी भाषा शिकवली गेलेली नाही. आशियाई आणि मध्यपूर्व अभ्यास विभागात सुमारे १३० विद्यार्थी आहेत. या विभागात जगभरातून विद्यार्थी येतात असंही मोकाशी म्हणाल्या आहेत. मराठी भाषा अभ्यासक्रमात विद्यार्थी प्राथमिक पातळीवर शैक्षणिक मराठी शिकतील. देवनागरी लिपीपासून सुरुवात होऊन व्याकरण, शब्दसंग्रह, वाचन, ऐकण्याचा आणि बोलण्याचा सराव करतील.

या वर्षाअखेरीस ते सोपे मराठी बोलायला आणि लिहायला शिकतील. तसेच गद्या आणि पद्या वाचन करू शकतील. माझ्या माहिती प्रमाणे इंग्लंडमध्ये मराठी भाषेचा अन्य अभ्यासक्रम सुरू नाही. परंतु बऱ्याच वर्षांपूर्वी लंडनला स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज (एसओएएस) या महाविद्यालयात मराठी अभ्यासक्रम सुरू होता, असे प्रा. मोकाशी यांनी सांगितले.

## जिल्ह्यात दोन नामांकन अर्ज दाखल




अमरावती, दि. २३ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत नामांकन अर्ज दाखल करण्याच्या दुसऱ्या दिवशी दोन नामांकन अर्ज दाखल करण्यात आले. मेळघाट आणि बडनेरा मतदारसंघात प्रत्येकी एक याप्रमाणे हे दोन अर्ज दाखल करण्यात आले आहे.

४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघात राजाराम भुऱ्याजी भिलावेकर – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ३७ बडनेरा विधानसभा मतदारसंघात राहुल लक्ष्मणराव मोहोड – बहुजन महा पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

## संपादकीय ......

# घातक खोडसाळपणाचे आव्हान

एकीकडे देशातील विमान प्रवाशांची संख्या वाढत असताना दुसरीकडे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. गेल्या काही दिवसांत बॉम्बच्या धमक्यांमुळे इमर्जन्सी लँडिंग करण्याचे प्रकार घडले. सोशल मीडिया किंवा ई-मेलच्या माध्यमातून फसव्या धमक्या दिल्या जात असताना त्यांना चाप कसा बसवावा, हा खरा प्रश्न आहे. बनावट संदेश पकडण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध आहे, तरीही सुरक्षा संस्था खोट्या धमक्या देणार्यांचा शोध लावू शकत नाही. यामागचे कारण पाहिले, तर असा खोडसाळपणा जगाच्या कानाकोपर्यात बसून कोठूनही करता येऊ शकतो.हवाई प्रवास सुरू करण्यापूर्वी बॉम्बच्या धमकीचा मेल किंवा फोन येणे आणि कालांतराने त्यात कोणतेही तथ्य नसल्याचे आढळून येणे या गोष्टी सातत्याने घडत आहेत. काही दिवसांपूर्वी लखनौहून पुण्याला येणार्या विमानात बॉम्ब ठेवल्याची 'एक्स'वरील पोस्ट ही दिशाभूल करणारी असल्याचे निष्पन्न झालेले असताना नुकतेच पुणे-जोधपूर इंडिगो विमानात बॉम्ब असल्याचा मेल धडकला; मात्र तपासांती तो मेल गोंधळ निर्माण करणारा असल्याचे स्पष्ट झाले. एकुणातच अशा फसव्या आणि धास्ती निर्माण करणार्या मेलमुळे हवाई प्रवाशांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. अफवांना कोणीही वाली नसतो आणि त्याला हजार पाय असतात. त्याचवेळी सत्य मात्र शाश्वत असते. कारण, त्याला दोनच पाय असतात. अफवांचे पेव तर काही क्षणात वार्यासारखे पसरते. दिशाभूल करणार्या अफवा चोहुबाजूंनी फिरून घरावर धडकलेल्या असतात. अफवा पसरण्यामागचे कारण समाजिक वृत्ती. आपला समाज हा चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टींना अधिक थारा देत असतो आणि म्हणून अफवांचा बाजार नेहमीच फुललेला असतो. दिल्ली, पुण्यासारख्या अनेक महानगरांत एकानंतर एक विमानात बॉम्ब ठेवल्याचा धमकीवजा संदेश देत गोंधळ निर्माण करणार्या घटना घडत असून काही ठिकाणी धमक्यांमागे शाळकरी मुले असल्याचे निदर्शनास आले आहे. समाजकंटक एखाद्या भागाबाबत समाजाची संवेदनशील मानसिकता पाहून तेथे बॉम्ब असल्याची अफवा पसरवतात आणि गोंधळ निर्माण करतात. परिणामी, अशा स्थितीत अफवा वेगाने व्हायरल होते. शाळेत जाणार्या पाल्यांच्या सुरक्षेवरून पाल्य नेहमीच सजग असतात. त्यामुळे शाळेत बॉम्ब ठेवल्याची सूचना मिळताच ते घरातून शाळेकडे धाव घेतात. सध्या विमानातील प्रवासी धास्तावले आहेत. कारण, विमानात एकानंतर एक बॉम्ब ठेवल्याच्या धमक्या मिळत आहेत. या धमक्यांमुळे विमान कंपन्या त्रस्त झाल्या आहेत, तसेच प्रवासीही घाबरले आहेत.

कोणत्याही विमानाला आपत्कालीन स्थितीत लँडिंग करावे लागत आहे, तर कधी कधी विमानाचा मार्ग बदलावा लागत आहे. काहीवेळा वेगवेगळ्या विमानतळांवर उतरावे लागत आहे. त्यांचा तपास केला असता त्यात कोणतेही संशयास्पद असल्याचे निदर्शनास येत नाही; पण तोपर्यंत विमानतळावर पळापळ झालेली असते आणि प्रवाशांचा वेळही वाया गेलेला असतो. शिवाय एअरलाईन्सला इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी देखील विलंब होतो. विमान प्रवासी नाही, तर रेल्वेलाही अशा प्रकारच्या धमक्यांनी ग्रासले आहे. रेल्वेमार्गावरही कधी कधी गॅस सिलिंडर, लोखंडी गार्डर यासारखी सामग्री आढळून येते आणि यामुळे अपघात होऊ शकतो. सणासुदीच्या काळात तर प्रत्येक जण घरी सुरक्षित जाऊ इच्छित असतो; पण अशा प्रकारच्या घटनांनी आणि वातावरणामुळे असुरक्षितता निर्माण झाली आहे. विमान प्रवास तर सर्वात सुरक्षित अणि सुलभ प्रवास मानला जातो; पण फसव्या संदेशांमुळे आणि धमक्यांमुळे हवेतही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या धमक्या सोशल मीडियावरून व्हायरल केल्या जात आहेत. अशा प्रकारच्या धमक्यांबद्दल थोडाही हलगर्जीपणा दाखविणे चुकीचे होऊ शकते.

समाजकंटक हँडलर हे सोशल मीडियावर अकाऊंट तयार करण्यासाठी व्हर्च्युअली प्रायव्हेट नेटवर्क किंवा डार्क वेब ब्राऊजरचा वापर करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. म्हणून त्यांचा आयपी अ‍ॅड्रेसचा शोध लावतानाही पोलिसांना बराच वेळ लागतो. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खोट्या प्रोफाईलचा मारा केला जातो. याप्रकारच्या धमक्यांबाबत आता सरकारने कडक धोरण अंगीकारले आहे. गृह मंत्रालयाने विमान कंपन्यांकडून संपूर्ण अहवाल मागितला आहे. विमान कंपन्या अगोदरच अडचणीत सापडलेल्या आहेत. तेलाच्या किमती वाढत असताना त्याचा ताण प्रवाशांवर येऊ नये आणि कर्मचार्यांनाही वेतन देताना अडथळा येऊ नये, यासाठी कसरत करावी लागत असताना सुविधांवरही बराच खर्च उचलावा लागत आहे. अशा धमक्यांमुळे कंपन्यांना उड्डाणे वळविणे, सुरक्षेची तपासणी, घिरट्या घालण्यासाठी अतिरिक्त इंधन आणि अडकलेल्या प्रवाशांसाठी हॉटेलमध्ये मुकामाची सोय करणे यासारख्या आकस्मिक खर्चांना सामोरे जावे लागत आहे. या बनावट धमक्यांच्या तपासात प्रथमदृष्ट्या कोणतेही कारस्थान असल्याचे दिसून येत नाही. त्यापैकी बहुतांश कॉल लहान मुले आणि समाजकंटकांनी केल्याचे आढळून आले आहे.

अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी नागरी उड्डयन मंत्रालयाने कडक नियमांची योजना आखली आहे. मंत्रालयाच्या सूत्रानुसार, विमानाच्या सुरक्षेसंदर्भात सुरक्षा यंत्रणांसह विविध भागिदारांच्या बैठकांच्या अनेक चर्चेच्या फेर्या झाल्या. मंत्रालयाकडून बॉम्बच्या खोट्या धमक्यांना रोखण्यासाठी कडक नियमावली तयार केली जात आहे. त्यात आरोपींना 'नो फ्लाय' यादीत टाकणे याचा समावेश आहे. यानुसार कोणत्याही दोषी व्यक्तीला विमानातून प्रवास करण्याची मुभा दिली जाणार नाही.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालंय पिक विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी कसा कराल दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती-** शेतकऱ्याला शासकीय मदत व पिक विमा मदत पदरात पाडून घ्यावयाची असेल तर नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या आतमध्ये नुकसानीचा दावा तो ही ऑनलाइन करायचा आहे.




मात्र, पाऊस पडून किंवा पिकाचे नुकसान होऊन ७२ तास उलटले तरी शेतात पाणी साचलेले आहे किवा नुकसानीपर्यंत जाणे अवघड होऊन बसले आहे, तर शासनाकडून पीक पंचनामा झाल्याशिवाय मदत मिळणार नाही.

शिवाय पावसामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीही वेगळ्याच असतात. साचलेल्या पाण्यामुळे शेतामध्येच प्रवेश करता येत नाही, त्यामुळे नुकसानीचा दावा करावा कसा असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

या पाच पद्धतीने नोंदवता येणार तक्रार

शेतकऱ्यांना क्रॉप इन्शुरन्स अ‍ॅप यामाध्यमातून झालेल्या नुकसानीची माहिती स्वतः भरायची आहे, याद्वारे माहिती भरल्यानंतर अधिकारी कर्मचारी हे पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर येणार आहेत.

आपापल्या भागात ज्या विमा कंपन्या काम करत आहेत त्यांच्या टोल फ्री क्रमांकाद्वारेही शेतकरी झालेल्या नुकसानीची माहिती सांगू शकतात.

तालुक्याच्या ठिकाणी विमा कंपनीच्या कार्यालयात शेतकरी हे ऑफलाइनही तक्रार करू शकतात. कंपनीकडून देण्यात आलेल्या फॉर्मवर आवश्यक ती माहिती भरावी लागणार आहे. ज्या बँकेत शेतकऱ्यांनी आपला विमा भरलेला आहे त्या बँकेच्या शाखेतही शेतकऱ्यांना तक्रारीचा अर्ज करता येणार आहे.शेतकऱ्यांना नुकसान झाल्याचे विमा कंपनीला कोणत्या ना कोणत्या माध्यमातून म्हणजे ऑनलाइन किंवा ऑफलाइन हे कळवावेच लागणार आहे.

नुकसानीचा दावा न केल्यास काय होणार?

सध्या ओढवलेल्या परिस्थितीमध्ये शेतकरी हा नुकसानीचा दावा करू शकला नाही तर काय होणार. यावर पीक विमा कंपनाने काय पर्याय काढला आहे का? तर याचे उत्तर आहे असा कोणताही पर्याय शेतकऱ्यांकडे नाही.

- नुकसानीच्या दाव्याशिवाय शेतकऱ्याला मदत मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान झाल्याचे विमा कंपनीला कोणत्या ना कोणत्या माध्यमातून म्हणजे ऑनलाइन किंवा ऑफलाइन हे कळवावेच लागणार आहे.

सध्या काय चित्र आहे गावशिवारात

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अ‍ॅपद्वारे तक्रार नोंदवण्याची तांत्रिक माहिती नाही. नुकसानभरपाईसाठी पात्र होण्यास शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. त्यामुळे ज्या तरुणाला याचे ज्ञान अवगत आहे त्या तरुणाकडून अ‍ॅपद्वारे माहिती भरून घ्यावी.

अधिक माहितीसाठी संपर्क

तसेच जवळील कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. तसेच कृषी रक्षक हेल्पलाईन - १४४४७ शी संपर्क साधू शकता.

# काबुली हरभऱ्याचे उत्पादन वाढविण्यासाठी ह्या आहेत सोप्या टिप्स.. वाचा सविस्तर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक-** महाराष्ट्रात लागवडीखालील असलेल्या विविध कडधान्यांमध्ये सर्वात जास्त क्षेत्र हरभऱ्याचे असून महाराष्ट्रात या पिकाखाली २९ लाख हेक्टर आणि विदर्भामध्ये ९.४० लाख हेक्टर क्षेत्र आहे. कमी उत्पादकतेची बरीच कारणे आहेत जसे बहुतांश क्षेत्रात या पिकाची पेरणी कोरडवाहू मध्ये केली जाते.

नवीन व सुधारीत वाणांची मोठ्या प्रमाणावर लागवड केल्यास हमखास उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल म्हणून नवीन सुधारीत वाणांचा वापर करावा. यात काबुली हरभऱ्याला बाजारात चांगली मागणी असते आणि बाजारभाव ही चांगला मिळतो.

**काबुली हरभरा लागवडीसाठी महत्वाच्या बाबी**

पीकेव्ही काबुली २ आणि ४ हरभऱ्याच्या टपोऱ्या दाण्याचे वाण आहेत. टपोऱ्या दाण्याला किंमत चांगली मिळते. म्हणून दाणे जास्तीत जास्त टपोर राहून उत्पादन जास्त मिळविण्याचा प्रयत्न असावा.

पेरणी शक्यतो ओलीताचे क्षेत्रात १० नोव्हेंबर पूर्वी करावी शक्यतो सरी वरंबा पध्दतीचा अवलंब करावा.

बियाण्याचे प्रमाण दाण्याच्या आकाराप्रमाणे वाढवावे. चाड्याचे छिद्र तपासून घ्यावे.



पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक विटाव्हॅक्स पॉवर ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे तसेच रायझोबियम (एकेसीआर-१) व पीएसबी ह जैविकखते प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे.

पेरणी जमीनीत योग्य ओलावा असतांना करावी.

ओलावा कमी असल्यास प्रथम ओलीत करावे. वाफसा आल्यावर पेरावे. पेरणीनंतर अंकूरण होईपर्यंत ओलीत करू नये किंवा पेरणी वरंब्याच्या दोन्ही बाजुला अर्ध्या उंचीवर करून ओलीत करतांना सद्या पेरणीच्या खालच्या पातळीत भराव्या.

पीक सुमारे ४५ दिवस तणमुक्त असावे. यासाठी खुरपणी व कोळपणी करणे आवश्यक आहे. शिफारशीत तणनाशक फवारतांना जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे.

हरभऱ्याच्या पिकाला २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद व ३० किलो प्रति हेक्टर पालाश पेरणी वेळेस द्यावे. (प्रति हेक्टर मात्रा १२५ किलो डीएपी अथवा ५० किलो युरिया ३०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट) तसेच जमिनीमध्ये जस्ताची कमतरता असल्यास २० किलो प्रति हेक्टर झिंक सल्फेट पेरणी सोबत द्यावे.

हरभऱ्याला फुलोरा असतांना व घाटे भरण्याच्या अवस्थेत ओलीत करावे.

पक्वतेच्या काळात घाटे आणि पाने पिवळे पडत असतांना ओलीत बंद ठेवावे आणि घाटे जास्त सुकण्यापुर्वी कापणी करावी.

स्प्रिंकलरद्वारे ओलीत करण्यास हरकत नाही. परंतु ओलीताद्वारे मोजकेच गरजेनुसार पाणी दिल्या जाईल याची काळजी घ्यावी.




# जवळचं धुरकट दिसतं- दृष्टी कमजोर झाली?

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

दीर्घकाळ स्क्रिनसमोर बसणं हे खूपच कॉमन झालं आहे. वाढत्या कामाच्या ताणामुळे लोक तासनतास कंम्प्यूटर आणि मोबाईल पाहत राहतात ज्यामुळे त्यांच्या डोळ्यांवर जोर पडतो. जर मध्ये मध्ये तुम्ही डोळ्यांना आराम दिला नाही किंवा स्क्रिन टाईम कमी केला नाही तर डोळ्यांशी निगडीत समस्या उद्भवू शकतात. जसं की कंम्प्यूटर व्हिजन सिंड्रोम किंवा ब्लर दिसणं याचा तुमचा कामावर चुकीचा परिणाम होऊ शकतो.



**आयुर्वेदीक पद्धतीनं डोळ्यांची काळजी कशी घ्यायची ते समजून घेऊ.**

आयुर्वेदात डोळ्यांची देखभाल करण्यासाठी पित्त दोषाचे संतुलन ठेवणं खूपच गरजेचं आहे. पित्त दोषाचा संबंध दृष्टी, पचनक्रिया, शरीराच्या तापमानाशी असतो. जर पित्त दोष वाढला तर डोळे सुकणं, प्रकाशाप्रती संवेदनशील असणं या समस्या उद्भवू शकतात. यासाठी पित्त दोष संतुलित ठेवणं गरजेचं आहे. यासाठी वेळोवेळी आयुर्वेदीक चिकित्सकांचा सल्ला घेत राहायला हवा.

**डोळ्यांचे व्यायाम** - आयुर्वेदात डोळ्यांचे व्यायाम दृष्टी सुधारण्यासाठी आणि डोळ्यांच्या मांसपेशींमध्ये ब्लड फ्लो सुधारण्यासाठी फायदेशीर ठरतात. यासाठी तुम्ही काही सोपे व्यायाम प्रकार करू शकता.

**पामिंग** : हा व्यायाम करण्यासाठी आपले हात एकमेकांना रगडा जेणेकरून गरम राहतील नंतर हात बंद उघडून डोळ्यांवर ठेवा. काही मिनिट आरामानं बसा नंतर दीर्घ श्वास घ्या. हा व्यायाम केल्यानं डोळ्यांचा ताण-तणाव दूर होईल आणि डोळ्यांना आराम मिळेल.

**ब्लिंकिंग व्यायाम-** हा व्यायाम केल्यानं डोळे साफ आणि मॉईश्चराईज राहतात आणि व्यवस्थित काम करतात. डोळ्यांचा कोरडेपणा दूर करण्यासाठी आणि एकाग्रता वाढवण्यासाठी हे व्यायाम करायला हवेत.

**फोकस शिफ्टिंग-** डोळ्यांची लवचीकता वाढवण्यासाठी काही सेकंदांसाठी दूर ठेवलेल्या वस्तूवर लक्ष केंद्रीत करा. नंतर कोणत्याही जवळच्या वस्तूवर लक्ष द्या. हा व्यायाम केल्यानं डोळ्यांना आराम मिळेल आणि एकाग्रता वाढेल.

**गाजर-** आयुर्वेदात डोळ्यांच्या चांगल्या कार्यक्षमतेसाठी गाजर उत्तम मानले जाते. गाजरामुळे शरीराला पोषण मिळते. काही खाद्यपदार्थ शरीरासाठी उत्तम मानल जातात कारण त्यामुळे शरीर मजबूत होते आणि पित्त दोष संतुलित होण्यास मदत होते. गाजर आणि हिरव्या पालेभाज्या याचे उत्तम उदाहरण आहेत. व्हिटामीन ए आणि बीटा कॅरोटीनचा चांगला स्त्रोत आहे. व्हिटामीन ए मुळे पाहण्याची क्षमता वाढते आणि बीटा कॅरोटीन डोळ्यांचा कमकुवतपणा रोखण्यास प्रभावी ठरते.

# शहर वाहतुकीत दि. २९ ऑक्टोबर रोजी तात्पुरता बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** बडनेरा-३७ विधानसभा मतदार संघातील उमेदवार यांना नामांकन अर्ज दाखल करण्याची मुदत दि. २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आहे. बडनेरा-३७ विधानसभा मतदार संघाचे नामांकन अर्ज जुने तहसिल कार्यालय, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ, अमरावती या ठिकाणी स्वीकारण्यात येणार आहे. या कार्यालया समोरील मार्ग अत्यंत गजबजलेला असतो. ही बाब लक्षात घेता या दिवशी शहर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे, अशी माहिती

## पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलीस विभागाचे आवाहन

अमरावती शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी दिली आहे.



तात्पुरत्या अधिसूचनेनुसार यादिवशी मुख्य पोस्ट ऑफीस, अमरावती ते तहसील कार्यालयाच्या भिंती पावेतो येणारी सर्व प्रकारची वाहतूक इतर मार्गाने वळविण्यात आली आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करून पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यायी मार्ग याप्रमाणे : वाहन चालकांनी श्याम चौक ते साबनपुरा व बापट चौक ते जवाहर गेटकडे जाणाऱ्या मार्गाचा अवलंब करतील. मुख्य पोस्ट ऑफीस, अमरावती ते तहसील कार्यालय या मार्गावरील आस्थापनाधारकांनी आपली वाहने सकाळी १० वाजेपूर्वी आस्थापनाकरीता आरक्षित पार्कींगमध्ये ठेवावी. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेदरम्यान प्रवेश बंदी असलेल्या मार्गावरून आपणास वाहन ने-आण करता येणार नाही. या कालावधीत आपणास वाहनाचे काम असल्यास आपण प्रतिबंधित मार्गाच्या बाहेर आपली वाहने अन्य सुरक्षित ठिकाणी पार्क करावी.या अधिसूचनांचे जो कोणी वाहनचालक उल्लंघन करेल, त्यांचेविरुद्ध मोटार वाहन कायद्याप्रमाणे कायेदशीर कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# 'या' टिप्स फॉलो केल्या तर दिवाळीतच काय, वर्षभर चमकेल तुमची वास्तु!

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

दिवाळी आल्यावर घराघरातून स्वच्छता अभियानाची सुरुवात होते. यंदा २८ ऑक्टोबरपासून दिवाळी सुरू होत असल्याने एकच आठवडा तयारी साठी शिल्लक राहिला आहे. अशातच दिलेल्या काही टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील. कारण आपले घर स्वच्छ ठेवण्यासाठी आपण सगळेच जण रोज प्रयत्न करतो. स्वच्छ घरात वातावरण प्रसन्न राहते आणि प्रसन्न वातावरणामुळे मनही प्रसन्न राहते. म्हणजेच स्वच्छतेचा परिणाम थेट आपल्या तना-मनावर होत असतो. विशेषत: सण वार आले की आपण घराची आवराआवर करतो. मात्र वास्तु शास्त्रात दीलेले नियम पाळले तर तुमच्या घरात रोजच उत्सवाचे आणि उत्साहाचे वातावरण राहील! शिवाय वास्तू दोष निर्माण होणार नाहीत आणि असल्यास दूर होतील.

नीटनेटके आवरलेले घर ठेवण्यासाठी उपयुक्त टिप्स

ब्रह्म मुहूर्तावर आणि तिन्ही सांजेला घरात केर काढू नये. हे दोन्ही मुहूर्त लक्ष्मीच्या आगमनाचे मुहूर्त मानले जातात. त्यामुळे स्वच्छता करायची असल्यास या मुहूर्ताच्या आधी किंवा नंतर केर काढावा.

घरातील कोपरे स्वच्छ ठेवावेत. विशेषतः ईशान्य, उत्तर, वायव्य या दिशांचे कोपरे स्वच्छ असावेत.

घरात कचरा टाकू नका. घर नेहमी स्वच्छ ठेवा. तसेच केराचा डबा वेळच्या वेळी धुवून स्वच्छ ठेवा.

गुरुवार सोडून आठवड्यातून एकदा पाण्यात मीठ टाकून घराची जागा पुसा. त्यामुळे घरातील नकारात्मकता नष्ट होईल. वादविवाद संपतील. तसेच लक्ष्मी घरात स्थिर राहील.




घराच्या स्वच्छतेइतकेच घरातल्या प्रसाधन गृहालाही स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करा. जाळे, जळमट लागू देऊ नका. तसेच तिथली फरशी स्वच्छ ठेवा. वास्तू मध्ये नकारात्मकता तिथून प्रवेश करते. म्हणून तेथील स्वच्छतेला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. घरात फार काळ अडगड साचू देऊ नका. अडगळ साचल्यामुळे घरात वाद विवाद होतात. घरातल्या लक्ष्मीचा क्षय होतो. घरात अडगळ असणे, हे वास्तूच्या दृष्टीने घातक मानले जाते. म्हणून पेपरची रद्दी असो नाहीतर जुन्या आणि वापरात नसलेल्या तुटक्या वस्तू असोत. त्यांची वेळोवेळी विल्हेवाट लावायला शिका.

वास्तूमध्ये मंगल लहरी निर्माण होण्यासाठी प्रसन्न संगीत, सुगंध, फुलझाडं यांचा वापर करा. मंद स्वरात देवाचा नामजप सुरु ठेवा. त्यामुळे वातावरणात सहजता राहते.

घराइतकाच महत्त्वाचा आहे घराचा उंबरठा. तो रोजच्या रोज स्वच्छ करून, शक्य असल्यास सायंकाळी उंबरठ्याजवळ दिवा लावून त्याची हळद कुंकू वाहून पूजा करा. तसेच रोज सकाळी दोन बोटं रांगोळी काढा. तो लक्ष्मीच्या आगमनाचा मार्ग असल्याने तेथील स्वच्छताही महत्त्वाची आहे.

नीटनेटके आवरलेले घर जसे आपल्याला आवडते, तसे देवालाही आवडते. अशा घरात सुख, शांती, समृद्धी सदैव नांदते.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# अभिजीत अडसूळ यांना दर्यापुरातून शिवसेनेची तिसऱ्यांदा उमेदवारी

## मेळघाटच्या उमेदवाराबाबत उल्लेख नाही पटेलांची घरवापसी होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३दर्यापूर –** माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांना शिवसेनेची (शिंदे गट) उमेदवारी जाहीर झाली आहे. त्या पहिल्याच यादीत अडसूळ यांचे नाव आले आहेत. कॅप्टन अभिजीत अडसूळ यांना २००९ मध्ये शिवसेनेने उमेदवारी दिली होती, त्यावेळी ते विजयी झाले होते. त्यानंतर २०१४ मध्ये ते पराभूत झाले होते. दरम्यान २०१९ च्या निवडणुकीत हा मतदारसंघ युतीमध्ये भाजपच्या वाट्याला आला होता. दरम्यान २०२४ मध्ये पुन्हा एकदा शिवसेना शिंदे गटाने अडसूळ यांना संधी दिली आहे. शिवसेना शिंदे



गटाने पहिल्याच यादीत अडसुळांना संधी दिल्यामुळे भाजपचे या निवडणूकीत दर्यापूर लढवण्याचे स्वप्न आता भंग झाले आहे. काही दिवसांपूर्वीच भाजपच्या नेत्या नवनीत राणा यांनी दर्यापूर मतदार संघात महायुतीमधून भाजपच्या उमेदवारानेच निवडणूक लढवावी, असे सांगून 'ट्विस्ट' निर्माण केला होता. त्यामुळे पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकीप्रमाणेच अडसूळांचा हिरमोड होईल काय, असे राजकिय वर्तुळात बोलल्या जात होते. मात्र अभिजीत अडसूळ यांना आज उमेदवारी जाहीर होताच त्या शंकेला जवळपास पूर्णविराम मिळाला आहे.

### राजकुमार पटेलांचे काय होणार?

पंधरा दिवसांपूर्वीच आमदार राजकुमार पटेल यांनी प्रहारला सोडचिठ्ठी दिली आणि ते आता शिवसेनेत (शिंदे गट) जाणार असल्याची चर्चा होती. मात्र पटेल यांनी शिवसेनेत प्रवेश केला नाही. दरम्यान पटेल यांना शिवसेनेकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे मात्र मंगळवारी जाहीर झालेल्या पहिल्या यादीत पटेल किंवा अन्य कोणत्याही उमेदवाराचे मेळघाट मतदार संघातून नाव नाही.त्यामुळे पटेलांचे काय होणार अशी चर्चा सध्या मेळघाटात जोर धरू लागली आहे तर तिकीट मिळालीच नाही पटेल पुन्हा बच्चू कडूंच्या प्रहार मध्ये घर वापसी करू शकतात. गेल्या वेळेस हि राजकुमार पटेल हे आ.वाचू कडू यांच्या मुळेच विधानसभेत पोहचले होते हे विसरून चालणार नाही.

# विधानसभा निवडणुकीसाठी खर्च निरीक्षक दाखल

## जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षांना भेटी

### खर्चाच्या समितीकडून आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी खर्च निरीक्षक अमरावती येथे दाखल झाले आहे. व्यंकन्ना तेजावत आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांचे आज अमरावती आगमन झाले. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात खर्च समितीच्या कार्याचा आढावा घेतला.




यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, खर्च समितीचे नोडल अधिकारी विजय देशमुख आदी उपस्थित होते. खर्च निरीक्षक व्यंकन्ना तेजावत यांच्याकडे ३६ – धामणगाव रेल्वे, ३७ – बडनेरा, ३८– अमरावती, ३९ – तिवसा आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांच्याकडे ४० – दर्यापूर, ४१ – मेळघाट, ४२ – अचलपूर, ४३ – मोर्शी या मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.श्री. तेजावत यांनी खर्च समितीकडून जिल्ह्याचा आढावा घेतला. प्रामुख्याने ज्या बाबींवर उमेदवारांकडून आक्षेप नोंदविला जातो, अशा बाबींचा खर्च नोंद करताना काळजी घेण्यात यावी. तसेच उमेदवारांच्या रॅली, प्रचारसभा यांच्यावर होणारा खर्च नोंदविताना खबरदारी घ्यावी. याबाबत आक्षेप येणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी जिल्हा आणि विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती दिली. निवडणुकीसाठी फिरते पथक, स्थिर पथक, व्हीडीओ पथक आदींची नियुक्ती करण्यात आली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवसापासून ही सर्व पथके कार्यान्वित झाली आहे. पथकात नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कर्मचारी–अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असल्याची माहिती दिली.

# पहिल्या दिवशी अमरावतीत एकही नामांकन नाही

## आठही मतदारसंघातून २३६ उमेदवारी अर्जांची उचल

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवार, २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली. मात्र आजच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील आठपैकी एकाही मतदारसंघात कुणीच उमेदवारी (नामांकन) दाखल केली नाही.

दरम्यान सर्व आठही मतदारसंघातून २३६ उमेदवारी अर्जांची उचल करण्यात आली. एकाच व्यक्तीने एकापेक्षा अधिक अर्जांची उचल केल्याने प्रत्यक्षात व्यक्तींची संख्या मात्र यापेक्षा कमी आहे. निवडणूक यंत्रणेकडून मिळविलेल्या माहितीनुसार बडनेरा मतदारसंघासाठी २८ व्यक्तींनी ४३ अर्जांची उचल केली. तर दर्यापूर विधानसभा मतदारसंघासाठी २५ व्यक्तींनी ४४, तिवस्यात २३ व्यक्तींनी ४०, चांदूर रेल्वे – धामणगांव रेल्वे मतदारसंघात १४ व्यक्तींनी ३८ अर्जांची उचल



केली. मेळघाट विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आजच्या पहिल्या दिवशी २३ व्यक्तींनी ४१ अर्जांची उचल केली आहे. तर दुसरीकडे अचलपुर विधानसभा मतदारसंघासाठी १७ व्यक्तींनी ३० आणि मोर्शी–वरुड मतदारसंघात १८ व्यक्तींनी ३३ अर्जांची उचल केली. सर्वाधिक ५५ अर्जांची उचल अमरावती मतदारसंघात केली गेली. ३४ उमेदवारांनी हे अर्ज घेतले आहेत. आगामी २९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्जांची उचल आणि दाखल करण्याची शेवटची तारीख आहे.

# यजमान अमरावती संघासह, नागपूर, मुंबई, पुणे, सातारा संघाची आगे कूच

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे शानदार उद्घाटन संपन्न

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती आणि श्री शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीच्या पटांगणावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेत यजमान अमरावती संघासह मुंबई, पुणे, नागपूर, आणि सातारा या संघांनी आपल्या प्रतिस्पर्धी संघावर मात करत स्पर्धेची पुढील फेरी गाठली आहे. या स्पर्धेसाठी पश्चिम विभागातील ७२ संघांनी आणि जवळपास १२५० खेळाडू प्रशिक्षक आणि संघाचे व्यवस्थापक या स्पर्धेत सहभागी झाले आहे. खुल्या पटांगणावर चार कोर्टात या स्पर्धेला प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादासह सकाळी ठीक नऊ वाजता सुरू झाली.यजमान संत गाडगेबाबा अमरावती संघाने भक्त कवी अरसिंग मेहता विद्यापीठ गुजरात संघाचा ४९ विरुद्ध १७ असा ३२ गुणांनी एकतर्फी पराभव केला. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच यजमान अमरावती संघाने आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच बढत मिळवली होती. अमरावतीच्या पायल श्रीनाथ, मंजुळा पवार, अक्षदा धानोरकर आणि वैष्णवी बोके यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने सरदार पटेल विद्यानगर गुजरात या संघाचा ५३ विरुद्ध १४ असा ३९ गुणांनी एकतर्फी पराभव केला. नागपूर संघातर्फे श्वेता रत्नपारखी, क्षितिजा सालचरकर आणि साक्षी त्रिवेदी यांनी शानदार खेळाचे प्रदर्शन केले.सर्वात रोमहर्षक ठरलेल्या सामन्यात एसएनडीटी मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाचा सुरक्षेच्या लढतीत ४० विरुद्ध ३८ असा केवळ दोन गुणांनी पराभव केला. क्षणोक्षणी एक दुसऱ्या कडे झुकणाऱ्या या सामन्यात मुंबई संघाने शानदार विजयश्री खेचून आणली. मध्यंतरापर्यंत मुंबईचा संघ २८ विरुद्ध १० असा १८ गुणांनी आघाडीवर होता. पण कोल्हापूर संघाने आपला खेळ उंचावत शेवटपर्यंत कडवी झुंज दिली. पण हा संघ विजयी होऊ शकला नाही. विजय संघातर्फे स्वाती भोसले आणि धनश्री कदम यांनी



उत्कृष्ट चढाई करत तर कशिश पाटील हिने उत्कृष्ट पकडीच्या भरोशावर आपल्या संघाला विजय मिळवून दिला. पराभूत कोल्हापूर संघातर्फे अर्चना झोरे, श्रद्धा माळी आणि ऋतुजा अंभी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. त्यानंतर झालेल्या सामन्यात बालाजी विद्यापीठ पुणे संघाने बरकत तुला विद्यापीठ भोपाळ संघाचा ३६ विरुद्ध ३३ असा तीन गुणांनी पराभव केला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात मध्यंतरापर्यंत बालाजी विद्यापीठ पुणे १९ विरुद्ध १७ असा केवळ दोन गुणांनी आघाडीवर होता. शेवटपर्यंत चिवट झुंज देत बालाजी विद्यापीठ पुणे संघाने विजयश्री खेचून आणली. विजय संघातर्फे हर्षदा इंदरे, तेजू सपकाळ आणि शुभदा खोत यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यानंतरच्या सामन्यात कर्मवीर भाऊराव पाटील सातारा विद्यापीठ संघाने सरनिम गुजरात विद्यापीठ देसर या संघाचा ४६ विरुद्ध १७ असा २९ गुणांनी एकतर्फी पराभव केला. प्रारंभ पासूनच सातारा संघाने या सामन्यात बडत मिळवली होती. आजच्या पहिल्या दिवशी झालेल्या सामन्याचे निकाल हे खालील प्रमाणे आहे. कच्छ विद्यापीठ गुजरात मात कढी विद्यापीठ गांधीनगर ४४ विरुद्ध ८. भावनगर विद्यापीठ भावनगर मात महाराजा विद्यापीठ भरतपुर ३२ विरुद्ध २८.अवधेश प्रताप सिंग विद्यापीठ रेवा मात डॉक्टर एच एस गौर विरन विद्यापीठ सागर ३९ विरुद्ध २१. नवरंगपुरा विद्यापीठ अहमदाबाद मात गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठ अहमदाबाद ६२ विरुद्ध १२. राणी दुर्गावती विद्यापीठ जबलपूर मात साबरमती विद्यापीठ अहमदाबाद १५ विरुद्ध १०. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मात एल एन आय पी विद्यापीठ गोल्हेर ४५ विरुद्ध २२. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ औरंगाबाद मात शिवाजी विद्यापीठ गोल्हर ४८ विरुद्ध १२. आजच्या या स्पर्धेत पंच म्हणून देवी कामदी, संजय खारोखार, सुधाकर कहाळकर, शुभांगी तुमसरे आणि शोभा सहारे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे तांत्रिक समिती सदस्य म्हणून पद्माकर देशमुख सतीश डफळे आणि सुभाष चव्हाण हे काम पाहत आहे.

# क्रीडांगणाची जागा गजानन महाराज शिक्षण संस्थेच्या घशात

## भाजप नेते तुषार भारतीय यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती –** आमदार रवि राणा यांनी महापालिकेच्या जागेवरील क्रिडांगणाचे आरक्षण हटवून ती जागा गजानन महाराज शिक्षण संस्थेच्या घशात घातल्याचा आरोप भाजप नेते तुषार भारतीय यांनी केला. मौजे अकोली सर्वे नं. ५ मधील मंजूर विकास योजना आरक्षण क्रमांक ४३१ क्षेत्र ४.०७ हे. आर ही जागा १ रुपये प्रति स्केअर फुट प्रति वर्षानुसार घेत स्थानिक स्वराज्य संस्थेचे नुकसान केल्याचा आरोप केला. लोकप्रतिनिधी हे स्वराज्य संस्थेचा महसूल वाढविण्यासाठी जर काम करु शकत नाही तर अशा प्रकारे महापालिकेचे आर्थिक नुकसान करण्यासाठी असतात का? असा प्रश्न करित त्यांनी आमदार रवि राणांवर सरसंधान साधले.

तुषार भारतीय यांनी पत्रपरिषदेमध्ये आमदार रवि राणा यांच्या श्री गजानन महाराज शिक्षण संस्थेच्या नावाने कशा प्रकारे क्रिडांगणाचे आरक्षण हटवून तीबळका विण्या त आली याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की कोरोना काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देऊन ही जागा गजानन महाराज शिक्षण संस्थेला कायम स्वरुपी मालकी हक्काने देण्यात यावी, याची मागणी केली. मुख्यमंत्र्यांनी सुध्दा तात्काळ प्रस्ताव अ प्रमाणे सादर करण्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी



दबावतंत्राचा वापर करीत अधिकाऱ्यांकडून ते आरक्षण हटवून घेतले. श्री गजानन महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा येथील संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये आमदार रवी राणा यांच्या परिवारातील सर्व सदस्य समाविष्ट आहे. जागेवरील आरक्षण हटवून भविष्यातील युवा पिढीचे व खेळाडूंचे नुकसान केले. स्थानिक स्वराज्य संस्थाचे सुध्दा नुकसान केले. एकीकडे लोकप्रतिनिधी संस्थेच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करतात तर दूसरीकडे मात्र जर लोकप्रतिनिधीच जागा बळविण्याचे षडयंत्र करित असतील तर त्यांना सावकारच म्हणावे लागेल, असेही ते म्हणाले.

### आरोप खोटे, भारतीय यांना खोटे बोलण्याची सवय


श्री गजानन महाराज शिक्षण संस्थेसाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच जमीन मिळवली आहे. यात कोणताही खोटेपणा नाही. त्यामुळे भारतीय यांनी माझ्यावर केलेले आरोप खोटे आहेत. रेटून खोटे बोलण्याची त्यांना सवय आहे.

– आ. रवी राणा.

# मनपा आयुक्त सचिन कलंत्री यांनी आरोग्य विभागाच्या बडनेरा मोदी हॉस्पिटल व मसानगंज आरोग्य केंद्राची कसून केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती –** महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने बडनेरा येथील शहरी आरोग्य केंद्र, पॉली क्लिनिक व इतर शहरी आरोग्य केंद्रात सर्व आरोग्याच्या सुविधा देण्यात येतात त्या सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचवा ह्या साठी आरोग्य केंद्रात पाहणी साठी स्वतः मनपा आयुक्त क्शन मोड वर आलेले आहेत सकाळीच दवाखान्याची उघडण्या बरोबर मनपा आयुक्त व आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांनी मसानगंज ( छत्रसाल नगर) येथे सकाळी – सकाळी भेट दिलीं त्या आरोग्य केंद्र च्या डॉ.अल्मस खान उपस्थित होत्या त्यांनी आयुक्त यांना उपलब्ध असलेल्या लसीकरण चा साठा, लॅब टेक्निशियन नी घेतलेल्या, रक्त नमुण्याचा रिपोर्ट व तपासणी कसे करतात , आशा वर्कर कसे काम करतात , किती लोकांच्या घरी भेटी देतात, आरोग्य बहुउद्देशीय कर्मचारी यांचे दैनंदिन रजिस्टर , व वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेली सुष्म साथ रोग बद्दल दिलेल्या सूचना ह्या काटेकोर पने होतात की नाही व रुग्णांना औषध उपचार मिळतात की नाही ह्या साठी मनपा आयुक्त सचिन कलंत्री यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या डायऱ्या व इतर रजिस्टर तपासले तसेच बडनेरा येथील डॉ अकिब खान यांनी सर्व दवाखाना दाखवून इथे होणाऱ्या उपचार संदर्भात दवाखान्याची माहिती दिली व डेंग्यू व चिकन गूनियां ह्या साठी करण्यात येणाऱ्या पूर्व प्रतिबंधात्मक उपाय सांगितला सर्व घरा घरा चा सर्वे करा जिथे साचलेले डबके आहेत तिथे टमिपोस क्टिव्हिटी किंवा इतर ठिकाणी मोठे चिखलात वैगरे असणारे तिथं ऑईल बॉल , गप्पी मासे , हौद मध्ये ,विहरी मध्ये ,गप्पी मासे टाकून घरातील दूषित कंटेनर जनतेला सांगून स्वच्छ करावे असे त्यांनी निर्देश दिलेत माझे कुटुंब माझी जबाबदारी ह्या नुसार जनतेनी सुधा घरात कुलर , फ्रीज , फुल दानी ह्या मधील स्वच्छ पाणी मधील लारवा वैगरे दिसल्यास कोरडे करावे असे त्यांनी माहिती दिलीं , लसीकरण व माता व बाल यांची नियमित तपासणी करावी प्रत्येक मोहल्यात शिबिर लावून महानगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आरोग्य कार्यक्रम याची जनतेपर्यंत पोहचली पाहिजे ,रक्त नमुने वेळेवर तपासणी झाली पाहिजे तसेच डॉ .विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी सुध्दा मसानगज व मोदी हॉस्पिटल च्या वैद्यकीय अधिकारी यांना कान ठणकावून सांगितले आशा ,व बहुउद्देशीय कर्मचारी व स्वतः वैद्यकीय अधिकारी यांची जनतेच्या संपर्कात राहून आरोग्य शिबिर , व साथ रोग निर्मूलन साठी कार्य करावे अन्यथा कार्यवाही करण्यात येईल आणि स्वच्छ्ता विभागाचे डॉ अजय जाधव यांना सुद्धा कडक आदेश दिले रोज प्रत्येक घरा घरात फॉगिंग , स्पेयिंनग , नाल्या व कचरा साफ झाला पाहिजे अन्यथा त्या ठेकेदार वर दंडात्मक कर्ववाही करा नाही तर ठेका रद्द करण्यास प्रस्ताव पाठवा असे ठण कावून सांगितले शेवटी मनपा आयुक्त सचिन कलंत्री यांनी आरोग्य विभागाची पाहणी केल्या



नंतर डॉ.विशाल काळे यांचे काम सर्व व्यवस्थित असल्याचे कौतुक केले ह्या भेटी दरम्यान शहर साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ रुपेश खडसे यांनी साथ रोग बद्दल संपूर्ण माहिती दिली व स्वच्छ्ता वैद्यकीय अधिकारी अजय जाधव यांनी सुध्या नियमित काम मध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही असे सांगितले व मनपा च्या सहायक आयुक्त धनंजय शिंदे , शशिकांत निवाने शारदा गुल्हाने, वैभव देवकर व मुख्यालययाचे आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी यांच्या समवेत सर्व पाहणी करण्यात आली.

# १०५ काँग्रेस, ९५ उद्धवसेना, ८४ शरद पवार गट

# अखेर महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरला!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मुंबई:** काँग्रेस आणि उद्धवसेनेतील वाद शमल्यानंतर मंगळवारी सुरू झालेल्या महाविकास आघाडीच्या चर्चेचे गुऱ्हाळ रात्री उशीरापर्यंत सुरू होते. रात्री उशीरा ठरल्यानुसार काँग्रेस आणि उद्धवसेनेतील जागा वाटपावर मार्ग काढण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार काँग्रेस सर्वाधिक १०५ च्या घरात जागा लढणार आहे, त्याखालोखाल उद्धवसेना ९५ च्या घरात आणि शरद पवार गट ८४ च्या घरात जागा लढवणार असून उरलेल्या जागा लहान मित्र पक्षांना सोडण्यात आल्याचे मविआतील सूत्रांनी सांगितले. दीर्घ काळ चाललेल्या या बैठकीत मविआला पाठिंबा दिलेल्या लहान पक्षांच्या नेत्यांशीही चर्चा झाली.

दोन दिवसांपूर्वी झालेली मविआची बैठक तब्बल ११ तास चालली होती. या बैठकीनंतरही विदर्भ आणि मुंबईतील १५ जागांवरील तिढा या तीन पक्षात कायम होता. विदर्भातील जागांवरून तर काँग्रेस आणि उद्धव सेनेतील वादामुळे आघाडी तुटण्याच्या मार्गावर होती.

### लहान पक्षांचीही मनधरणी करण्यात यश

यात डावे पक्ष आणि इतर पक्षांच्या नेत्यांची मनधरणी करून त्यांना मविआसोबत येण्याची विनंती तीनही पक्षाच्या नेत्यांनी केल्याचे समजते. या बैठकीत कोणत्या पक्षाने किती व कोणत्या जागा लढवायच्या यावर शिक्कामोर्बत झाले. त्याबाबतची अधिकृत घोषणा बुधवारी केली जाणार आहे.



– मात्र काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी आणि उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे हा वाद शमला आणि थांबलेली मविआची चर्चा मंगळवारी पुन्हा सुरू झाली. त्यापूर्वी दिवसभरात विविध नेत्यांच्या भेटीगाठीतून घेतलेली सामंजस्याची भूमिका तीनही पक्षातील समन्वय आणि संबंध चांगले राहतील याची खबरदारी मविआच्या नेत्यांनी घेतली.

त्यामुळे मंगळवारी सर्व जागा वाटपाची चर्चा संपवायची असा निश्चिय मविआच्या नेत्यांनी केला होता. त्यामुळे सर्व तोडगा काढण्यात पुन्हा मंगळवारी रात्री उशीरापर्यंत ही बैठक चालली आणि त्यातून तोडगा काढण्यात आल्याचे समजते.

### बारामतीत अजित पवार वि. युगेंद्र पवार

शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांना बारामतीतून उमेदवारी निश्चित झाली असून पक्षाने मंगळवारी त्यांना एबी फॉर्म दिला आहे. युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहेत.

बारामतीतून अजित पवार विधानसभेला उभे राहिले तर इथे लोकसभेप्रमाणे पवार घराण्यात लढत बघायला मिळेल. बारामतीतील हा सामना काका (अजित पवार) विरुद्ध पुतण्या (युगेंद्र पवार) असा असेल.

## वलगाव पोलीसांचा रूटमार्च

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३वलगाव–** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलिस आयुक्त यांच्या आदेशानुसार वलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने वलगाव येथे कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी व निवडणुकीच्या काळात कुठलीही अनुसुचित घटना घडू नये याकरिता रुटमार्च काढण्यात आला हा रुटमार्च वलगाव पोलीस ठाण्यापासून बालाजी चौक आझाद चौक गुरुदेव चौक कसाब पुरा हनुमान चौक तेली पुरा जय हिंद चौक मेन लाईन बाजारपेठ छत्रपती शिवाजी महाराज चौक लोकमान्य चौक जुना बस स्टॅन्ड चौक व परत बालाजी चौक हा रुटमार्च सकाळी दहा वाजता पासून ते बारा वाजेपर्यंत काढण्यात आला सोबतच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वलगाव गावातील नागरिकांनी कुठल्याही प्रकारची व्हाट्सअप फेसबुक इंस्टाग्राम व इतर काही सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करू नये याची सुद्धा जनजागृती वलगाव पोलिसांच्या वतीने करण्यात आली व निवडणुकीच्याकरून वादग्रस्त वक्तव्य करू नये अशी सुध्दा सुचना वलगाव पोलीसांच्या वतीने देण्यात आली तसेच लहान मुला मुलींनी नागरिकांनी व महिलांनी कुठल्याही प्रकारची भीती निवडणुकीच्या काळात बाळगू नये हा रुटमार्च वलगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव पानसरे यांच्या नेतृत्वात काढण्यात आला या रुटमार्च मध्ये सी आर पी एफचे २५ जवान क्यू आर टी चे ५ जवान पी एस आय ४ पोलीस अंमलदार १० या सर्वांच्या नेतृत्वात हा रूट मार्च काढण्यात आला.



## अल्पवयीन मुलीसह युवकाची रेल्वेखाली आत्महत्या

### अंजनगावबारी येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अंजनगाव बारी–** नजिकच्या अंजनगावबारी येथील अल्पवयीन मुलगी आणि युवकाचा मृतदेह बडनेरा–टिमटाळा रेल्वे मार्गावर आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.काजल श्रीकृष्ण यमगर (वय १७) आणि अमन नंदू आतराम (वय १८) अशी मृत मुलगी व युवकाची नावे आहेत. अंजनगाव बारी येथील रतन सखाराम यमगर यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात सकाळी तक्रार नोंदविली. मुलगी काजल सकाळी साडेचारच्या सुमारास घरून निघून गेल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले. तशीच तक्रार नंदु काशीराम आतराम यांनीही ठाण्यात नोंदविली. मुलगा अमन सकाळी कामानिमित्त बाहेर गेल्यापासून घरी परतलाच नाही, असे त्यांनी तक्रारीत नमूद केले. या दोन्ही



तक्रारीवरून बडनेरा पोलीसांनी शोधमोहीम सुरू केली. दरम्यान अंजनगावबारी लगत बडनेरा टिमटाळा रेल्वेरुळावर मुलगी आणि युवकाचा रेल्वेने कटून मृत्यू झाल्याचे आढळून आले. पोलीसाना मृतदेहाची ओळख अमन नंदु आतराम (वय १८) तसेच काजल श्रीकृष्ण यमगर (वय १७) या नावाने पटवली. ते दोघेही एकमेकांच्या शेजारी राहत असल्याचे समजते. ही घटना प्रेमप्रकरणातून घडल्याचे पोलीसांना तपासाअंती समजले. पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास केला जात आहे.

## मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळेची मतदान जनजागृती रॅली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती –** येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी तसेच अमरावती शहरातील प्रत्येक परिसरात मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती व्हावी या उद्देशाने उपक्रम राबविण्यात येत असून नक्कीच मनपा उर्दू हायस्कूल ,मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ०८ यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील परिसरात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.




यावेळी स्वीप विभागाचे सहाय्यक कार्यक्रमाधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉक्टर प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक योगेश पखाले , शाळेचे मुख्याध्यापक युसुफ खान तसेच हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री सईद सर,क्रीडा निरीक्षक प्रवीण ठाकरे, स्वीप विभागातील सदस्य उज्वल जाधव, सुमेश वानखडे, योगेश राणे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

जनजागृती रॅली दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांना व उपस्थित पालकांना मतदानाबाबत शपथ सुद्धा देण्यात आली तसेच मनपा हिंदी शाळा क्रं.१२ नागपुरी गेट या शाळेने सुद्धा शाळेच्या परिसरातील गर्दी असणाऱ्या चौकाचौकातून तसेच गल्लीगल्लीतून मतदान जागृती रॅली काढून मतदान करणे का गरजेचे आहे याबद्दल मतदारांमध्ये जागृती करण्यात आली.

## दरोड्याच्या तयारीत असलेल्या नऊ जणांना मोझरीत पकडले

### एका कारसह दहा मोबाइल जप्त

### एलसीबीची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मौन श्रद्धांजली कार्यक्रमासाठी सोमवारी लाखो गुरुदेव भक्त मोझरीत दाखल झाले होते. या वेळी मोझरी व परिसरात प्रचंड गर्दी होत असल्यामुळे बंदोबस्तासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तैनात होते. याच दरम्यान दासटेकडी ते डवरगाव मार्गावर काही जण दरोड्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्या आधारे पोलिसांनी सोमवारी रात्री ९ जणांना अटक केली आहे.



जावेद खान करीम खान (२२), शे. हुसेन शे. अयुब (२४), सोहेल खान हस्सन खान (१९ तिघेही रा. पातूर, अकोला), फहीम खान अहमद खान (२७ अकोटफैल,अकोला), अनिल गंगाधर गायकवाड (२४, शंकरनगर, अकोला), मिर्झा रहेबर बेग मिर्झा अजहर बेग (२३), फैजल शहा अफसर शहा (२४), आशुतोष ऊर्फ पंकज श्रीकृष्ण बेलोरकर (३०, सर्व रा. अकोला) आणि शेख जुनेद शेख अयुब (२०, रा. पठाण चौक, अमरावती) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ते अकोला येथून चारचाकी वाहनाने मोझरीत आले होते. तसेच त्यांच्याकडील मिरची पुड, दोरी, चाकू, दहा मोबाइल पोलिसांनी जप्त केले. नेमका कुठे दरोडा टाकणार होते, याची माहिती पोलिस घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पीआय किरण वानखडे, पीएसआय सागर हटवार, पीएसआय मुलचंद भांबुरकर व पथकाने केली आहे.


## केवळ ६० दिवस आधीच करता येणार आरक्षण

### १२० दिवसांचे अग्रिम आरक्षण आता ३१ ऑक्टो. पर्यंतच वैध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** अग्रिम आरक्षणाच्या नियमात भारतीय रेल्वेने बदल केला आहे. याआधी १२० दिवस आधी रेल्वेचे आरक्षण करता येत होते. परंतु, आता दोन महिने आधी अर्थात ६० दिवस आधी अग्रिम आरक्षण करता येणार आहे. त्यामुळे ज्यांनी दिवाळी, छठपूजेच्या निमित्ताने चार महिने आधी अग्रिम आरक्षण केले होते, त्यांचे आरक्षण हे ३१ ऑक्टोबरपर्यंतच वैघ राहणार आहे. त्यानंतर ते रद्द समजले जाईल. १२० दिवसांच्या आरक्षण पद्धतीत बहुतांश रद्द केले जायचे. त्या तुलनेत दोन महिन्यांचे अग्रिम आरक्षण रद्द केले जाण्याची शक्यता फारच कमी असल्याची माहिती भारतीय रेल्वेद्वारे देण्यात आली आहे.

मोठ्या प्रमाणात आरक्षण रद्द केले जात होते. त्यामुळे आसने रिकामी राहायची किंवा ज्यांना गरज आहे, त्यांना वेळेवर आरक्षण मिळायचे नाही. त्यामुळे अग्रिम आरक्षणाचा कालावधीहा ६० दिवस केला आहे. ज्यांनी आरक्षण रद्द केले नाही, त्यात फसवणूक होण्याची शक्यता जास्त असायची. तसेच केवळ १३ टक्केच प्रवासी १२० दिवस आधी आरक्षण करायचे. त्याचवेळी बहुतांश अग्रिम आरक्षण हे ४५ दिवस आधी केले जाते. दिवाळीला १० दिवस राहिले असून त्यानंतर छठ पूजा आहे. या दोन्ही मोठ्या सणांसाठी मुंबई, पुणे तसेच इतर महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायासाठी आलेले प्रवासी मोठ्या संख्येत



गृहनगरात परत जातात. ते बघता एजंट सक्रिय होऊन तिकिटांचा काळाबाजार करतात. यामुळे रेल्वेचे नुकसान होऊन प्रवाशांचेही आर्थिक नुकसान होत असते. ते बघता अग्रिम आरक्षणाची मुदत दोन महिने केली आहे. ज्यांनी १२० दिवसांआधी अग्रिम आरक्षण केले, त्यांचे तिकीट ३१ ऑक्टोबरपर्यंतचे असेल तरच ते ग्राह्य धरले जाईल. मात्र, त्यानंतरच्या तारखेचे आरक्षण रद्द समजले जाईल, अशी माहिती भारतीय रेल्वेद्वारे देण्यात आली.

## अवैध सावकाराच्या ताब्यातून सोडविल्या १५ दुचाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ पोहरा** बंदीपोहराबंदी येथील अवैध सावकाराने गावातील व आसपासच्या खेड्यातील काही लोकांच्या दुचाकी ८ ते १० हजार रुपयात गहाण ठेवलेल्या होत्या, अशा एकूण १५ दुचाकी स्पेशल पथकाने सोडवून सावकाराविरुध्द कारवाई केली. सागर ज्ञानेश्वर गावंडे असे अवैध सावकाराचे नाव आहे.पोहराबंदी येथील रहिवाशी सागर गावंडे हा गावात अवैध सावकारी करीत असून गरिब व गरजू लोकांच्या दुचाकी ८ ते १० हजार रुपयात गहाण ठेवतो. तसेच त्यांच्याकडून १० ते २० टक्क्याने व्याज वसूल करतो. त्यामुळे गावातील नागरिक गावंडेच्या अवैध सावकारीला त्रस्त झाले होते. याबाबत स्पेशल पथकाचे अधिकारी आसाराम चोरमले यांना माहिती मिळताच त्यांनी सोमवारी रात्री गावंडेच्या घरी धाड टाकली. तसेच पुर्ण घराची पाहणी केली असता घराच्या मागच्या बाजूला १५ वेगवगेळ्या दुचाकी दिसताच पोलिसांनी त्याला विचारपूस केली. तसेच सर्व दुचाकीचे कागदपत्र मागितले. परंतु गावंडे याने उडवाउडवीची उत्तरे दिली असता पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन सर्व दुचाकी जप्त करून ठाण्यात आणल्या आणि दुय्यम निंबधक अधिकाऱ्यांना माहिती दिली.

## संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला स्व.डॉ.रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** डॉ. रमेश गोडबोले यांच्या सेवा व अद्वितीय कार्याची स्मृती कायम राहावी तसेच त्यांच्या पश्चात राहिलेले कार्य सतत पुढे जावे व अनेकांना प्रेरणा मिळावी, याकरिता डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून पहिला पुरस्कार अमरावती येथील सेवा प्रकल्प संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला देण्याचे निवड समितीने ठरविले आहे. २७ नोव्हेंबरला हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहामध्ये आचार्य गोविंददेवगिरी महाराजांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती

आयोजन समितीचे प्रा. अविनाश मोहरील यांनी दिली.

अविनाश मोहरील यांनी सांगितले की, गोडबोले यांचे कार्य आध्यात्मिक, सामाजिक व धर्म क्षेत्रातही आहे. झिरी येथील श्री दत्त मंदिर, एकवीरा देवी, अंबादेवी मंदिर, अमरावती येथील गोपाळकृष्ण मंदिरात त्यांनी कीर्तन सेवा दिली. अनेक मंदिरे व न्यासांमध्ये विश्वस्त म्हणून त्यांनी सेवा दिल्या. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी देखील अंतिम श्वासापर्यंत सांभाळली. ते संघ स्वयंसेवक होते. त्यांच्या या कार्याची माहिती तसेच त्यांच्या कार्याच्या प्रेरणेतून अनेकांनी सेवाव्रती व्हावे, याकरिता त्यांच्या निकटवर्तीयांनी सेवा तसे अध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्ती किंवा संस्थांना स्व. डॉ. रमेश गोडबोले व स्मृती सेवा पुरस्कार देऊन करण्याचा मानस त्यांच्या पत्नी विदुला रमेश गोडबोले यांनी केला. त्या दृष्टीने बडनेरा अमरावती येथील त्यांच्या चाहत्यांनी एक समिती



तयार केली व न्यास स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे यावर्षी पुरस्काराची सुरुवात झाली असून पहिला पुरस्कार संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला देण्याचे निवड समितीने ठरवले आहे. एक लाख रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यक्रमाच्या निमित्त आयोजन समितीचे गठन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. दरवर्षी दिला जाणारा हा पुरस्कार नोव्हेंबर महिन्यामध्येच दिला जाणार आहे. दरवर्षी निवड समितीच्या वतीने पुरस्काराचे नाव घोषित करण्यात येईल. पहिल्यांदा आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार समारंभाला अधिकाधिक संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

# जिल्हा परिषदेतील स्वीप कक्षाचे उद्घाटन

## वॉल ऑफ प्राऊड वोटरची संकल्पना




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३ अमरावती :**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. यात जिल्हा परीषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात स्वीप कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. या सभागृहात वॉल ऑफ प्राऊड वोटरची संकल्पना साकारण्यात आली आहे.जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहूणे म्हणून स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस अधिक्षक विशाल आनंद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी आणि त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी वॉल ऑफ प्राऊड वोटर ही संकल्पना अभिनव आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असल्याने सर्व विभागांचा यात सहभाग महत्वाचा आहे. मतदानाची प्रक्रिया ही पारदर्शी पद्धतीने आणि कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय राबविल्या जाते. त्यामुळे या प्रक्रियेला विशेष महत्व आहे. मतदारांनी स्वयंस्फुर्तीने मतदानासाठी यावे यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. यामुळे मतदानाच्या टक्केवारीत वाढ होणार आहे.लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यात पिंक आर्मी, वीज देयकावरील मतदानाची आवाहन, विविध सामाजिक संघटनांना मतदार जागृती अभियानात सामावून घेण्यात आले. यामुळे जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत झाली आहे. यावेळीही मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी अभिनव उपक्रम राबविण्यासाठी सर्व विभागांनी पुढे यावे. सहयोगासाठी नागरीक चांगला प्रतिसाद देत असल्यामुळे यात त्यांचा सहभाग घ्यावा. नागरिकांपर्यंत वोटर स्लीप पोहोचविल्यास त्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.मनपा आयुक्त श्री. कलंत्रे यांनी, शहरी भागात मतदानाबाबत जागृती करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे. कर्मचारी आणि नागरिकांचे मतदान होणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेत विशेष सुविधा केली जाईल. यावर्षी नवमतदारांची नोंदणी झाली आहे. त्यांचे मतदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. लोकशाहीने दिलेल्या मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजावावा, असे आवाहन केले.पोलिस आयुक्त श्री. रेड्डी यांनी मतदान जागृतीसाठी पोलिस विभागातर्फे संपूर्ण सहकार्य केल्या जाईल. तसेच सर्व पोलिसांचे मतदान होण्यासाठी यंत्रणा तयार केली जाईल. पोलिसांचा सक्रिय सहभागामुळे मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढण्यास मदत होईल, असे सांगितले.जिल्हा पोलिस अधिक्षक श्री. आनंद यांनी लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क दिला आहे. त्यामुळे प्रत्येकाने पुढे येऊन मतदान करावे. मतदानासाठी पोलिस विभागातर्फे सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले.श्रीमती मोहपात्रा यांनी प्रास्ताविकातून स्वीप उपक्रमात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी ८० टक्के मतदानाचे उद्दीष्ट ठेवले असल्याचे सांगितले. मतदारांना समर्पित असे वॉल ऑफ प्राऊउ वोटर तयार करण्यात आले आहे. यामुळे जनजागृती होण्यास मदत मिळणार असल्याचे सांगितले. सुरवातीला जनजागृती कक्षाची फीत कापून उद्घाटन करण्यात आले. ज्ञानेश्वर घाटे यांनी सूत्रसंचालन केले. संजय राठी यांनी आभार मानले.

# राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ मध्ये मीनाक्षी खरटमोल यांचा आंतर विद्याशाखीय शिक्षण गटात सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



मीनाक्षी खरटमोल, विषय साधन व्यक्ती पंचायत समिती भातकुली, आस्थापना डायट अमरावती यांनी राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ अंतर्गत आंतरविद्याशाखीय शिक्षण या विशेष गटामध्ये यशस्वीरित्या सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षा होत आहे.

शिक्षण प्रक्रियेतील विविध अंगांची एकत्रित जाण आणि समन्वय साधण्याच्या त्यांच्याकडील दृष्टिकोनामुळे आंतरविद्याशाखीय शिक्षणात त्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.त्यांच्या योगदाना बद्दल त्यांचे प्राचार्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अमरावतीचे मिलिंद कुबडे, आणि सर्व अधिव्याख्याता जि.शि.प्र.सं.,अमरावती तसेच गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भातकुली ,दीपक कोकतरे सर , आणि भातकुली येथील विस्तार अधिकारी ,सर्व केंद्रप्रमुख ,विषय साधन व्यकी आणि सहयोगी यांनी भरभरून कौतुक केले असून, शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनीही त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे.तसेच शिक्षक समितीकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# रक्तदान हे एक महान सामाजिक कार्य आहे - प्रविण पोटे पाटील

## प्रविण पोटे पाटील यांनी रक्तदान करून केले विद्यार्थ्यांना प्रोत्साहित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**



पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयात आयोजित भव्य रक्तदान शिबिरात संस्थेचे अध्यक्ष मा. प्रविण पोटेपाटील यांनी रक्तदान करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

रक्तदान हे महादान आहे. मानवी रक्ताला कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने रक्तदान करणे हा एकमेव पर्याय समाजापुढे आहे.सध्या मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा असून त्याची भर या शिबिरात मोठ्या प्रमाणात रक्तदान करून आपल्याला पूर्ण करायची आहे. गरजवंत व्यक्तींना वेळेवर रक्त पुरवठा मिळाल्याने त्याचे प्राण वाचू शकतात, मानवी रक्ताला कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने रक्तदान करणे हा एकमेव पर्याय समाजापुढे आहे. रक्तदान हे एक महान सामाजिक कार्य आहे, संधी मिळेल तेव्हा अवश्य करा असे प्रतिपादन करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदान करण्याचे आवाहन यावेळी प्रविण पोटेपाटील यांनी केले.

# राष्ट्रीय कार्टींग चॅम्पिअनशिपमध्ये प्रो. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेराचे मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**




स्थानिक विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या प्रो. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. याचाच भाग म्हणुनयेथील मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थ्यांनी पल्सर गाडीच्या इंजिनपासून रेसिंग कार्ट तयार केली सोबतच ६ घु च्या डीसी मोटर ची इलेक्ट्रिक रेसिंग कार्ट सुद्धा केली.या दोन्ही कार्ट नुकतेच कोइम्बतूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत उतरविले. गो कार्ट स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत या विद्यार्थ्यांनी आठ बक्षिसांसह द्वितीय क्रमांक पटकावीत अमरावतीचे नाव राष्ट्रीय पातळीवर गाजविले.प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील मेकॅनिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेच्या मुलांनी प्रा. अभिजीत ठाकरे आणि प्रा. प्रियंका देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे तीन महिने गाडी बनविण्यासाठी परिश्रम घेतले.विविध स्तरांवर पडताळणी झाल्यावर त्याचे सादरीकरण कोइम्बतूर येथे करण्यात आले. कोइम्बतूर येथील ॲकॅडमी ऑफ इंडिजीनेईस मोटर स्पोर्टद्वारा (AIMS) कार्ट रेसिंग नॅशनल चॅम्पियनशिपचे आयोजन १९ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट पर्यंत करण्यात आले होते. यामध्ये देशभरातील सुमारे विविध राज्यांतील ४७ चमूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये १५० सीसी गाडीच्या श्रेणीमध्ये आणि इलेक्ट्रिक कार्टच्या श्रेणीमध्ये अमरावतीच्या मेघे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत आठ बक्षिसे पटकाविले.१. १५० उउ उत कार्ट श्रेणीमध्ये ऑल इंडिया रँक २ (उपविजेता).२. उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार३. एन्ड्युरन्स अंडर ल्ीं १५० लल कार्ट श्रेणीमध्ये पहिले स्थान४. उत १५० लल कार्ट श्रेणी अंतर्गत ऑटोक्रॉस इव्हेंटमध्ये विजेता (पहिला).५. उत कार्ट श्रेणी अंतर्गत मुलींच्या विशेष सहनशक्तीमध्ये प्रथम पारितोषिक (प्रथम).६. ५ किलोवॅट ते ६ किलोवॅट एत कार्ट श्रेणीतील ऑटोक्रॉस इव्हेंटमधील विजेता७. ईकार्ट श्रेणी अंतर्गत सर्वोत्कृष्ट सांघिक भावना पुरस्कार विजेते८. उत कार्ट श्रेणी अंतर्गत सर्वोत्कृष्ट नवोपक्रम पुरस्कार विजेतेप्रा. अभिजित ठाकरे यांच्या मार्गदर्शनात रहीश झाडे,अजिंक्य कळंबे, ऋतुजित देशमुख, वेदांत लोणारे, परिमल साबळे, रौनक लोटिया, आयुष पाटील, शौर्य चरपे, चैतन्य कथे, वलय आंडे, मंथन बुंदे, वेदांत राउत,शिवम मोझरे, कृणाल दाते, ओमकार पिंपळगावकर, गौरांग देवताळे, श्रेया अदसोड, प्राची इखार, समृद्धी देशमुख, सानिका दारोकर, आचल डोंगरदिवे, पायल डोंगरदिवे, सेजल गद्रे, सृष्टी शिरभाते, वेदिका निकम, आसावरी जुमडे, पृथ्वी धर्माळे, नेहा वाडी ,आदी विद्यार्थ्यांनी एकजुटीने गाडी बनवीत या स्पर्धेत सहभाग नोंदविला. या विद्यार्थ्यांवर महाविद्यालयीन व्यवस्थापनसह सर्वच स्तराहून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या यशस्वी प्रकल्पात मेकॅनिकल विभागाचे विभागप्रमुख डॉ. ए.डी. शिरभाते आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ.एस. वी. पट्टालवार यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

# पुणे- अमरावती २७ लालपरीचे बुकिंग हाऊसफुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळीपूर्व नियोजनात पुणे येथून अमरावतीकडे येणाऱ्या प्रवाशांकरिता अतिरिक्त बसचे नियोजन एसटी महामंडळाने केले आहे. पुणे येथून २५ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत ५० आदा बस धावणार आहेत. यापैकी आजघडीला २७ लालपरीचे बुकिंग हाऊसफुल्ल झाले आहे. अजूनही प्रवाशांकडून बुकिंग केले जात असल्याची माहिती विभाग नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी दिली.

पुणे येथे शिक्षण घेत असलेल्याविद्यार्थ्यांसह नोकरदार दिवाळीच्या सुटीत गावाकडे परततात. परंतु, खासगी बसचालक याचा फायदा घेत अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारून त्यांची आर्थिक लूट करतात. अशा प्रवाशांना सुविधा देण्याकरिता दरवर्षी एसटी महामंडळाच्या वतीने अमरावती-पुणे या मार्गावर अतिरिक्त बसेस सोडल्या जातात. मागील वर्षी या



मार्गावर ४५ अतिरिक्त बसेस सोडण्यात आल्या होत्या.

यंदा मात्र प्रवाशांची मागणी लक्षात घेता, पुणे येथून अमरावतीसाठी ५० अतिरिक्त बसचे नियोजन एसटी महामंडळाने केलेले आहे. पुणे येथील कँटोन्मेंट बोर्ड मैदान खडकी या ठिकाणाहून २५ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान अमरावतीसाठी बस धावणार आहेत. यापैकी २२ ऑक्टोबरपर्यंत अमरावतीसाठी २५ बसेस बुकिंग - हाऊसफुल्ल झाल्या आहेत.

**प्रवाशांना अशी करता येईल ऑनलाइन बुकिंग**

शिवशाही व साधारण बसची पुणे व अमरावती येथूनही ऑनलाइन बुकिंगची सुविधा एसटी महामंडळाच्या वतीने करण्यात आली. ऑनलाइन बुकिंग रेड बस तसेच ॲप्स व राज्य परिवहन विभागाच्या वेबसाइटवर जाऊन करता येणार आहे. याकरिता सांकेतिक कोड देण्यात आला आहे. पुण्याकरिता पीसीएनटी व अमरावतीसाठी एएमटी कोडचा वापर करता येईल.

# लवादा येथील बांबू केंद्राचे आकाश दिवे अमरावतीत विक्रीसाठी दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ परतवाडा**

धारणी तालुक्यातील लवादा येथील संपूर्ण बांबू केंद्रातर्फे तयार करण्यात आलेले आकर्षक आकाश दिवे अमरावतीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. दीपावलीनिमित्त तयार केलेल्या या दिव्यांची निर्मिती तेथील आदिवासी बंधू-भगिनी यांनी केली आहे. आदिवासी कुटुंबीयांनी स्वतःच्या हाताने बनवलेले हे सुरेख, सुंदर आणि आकर्षक आकाश दिवे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी नागरिकांनी या दिव्यांची खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले. आकाश दिवे खरेदी करण्यासाठी संयोजक राजेश इंदुरकर (केवल कॉलनी, शेगाव रहाटगाव रोड, अमरावती) यांच्याशी संपर्क करावा, असे कळवण्यात आले.

# रवी राणांनी मांडला मतदार संघात केलेल्या कामाचा लेखाजोखा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

महायुतीचा घटक पक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पार्टीने आमदार रवी राणा यांची उमेदवारी जाहीर केली असून बडनेरा मतदार संघातील गावागावात बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने राणा यांनी मागील १५ वर्षात केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचा लेखाजोखा मांडण्यात आला.

## अंजनगाव बारी सर्कलमधील लोकप्रतिनिधींची बैठक



नुकतीच अंजनगाव बारी सर्कलमधील गावागावातील जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, सरपंच, उपसरपंच यांनी बैठकीचे आयोजन करून राणा यांना जाहीर पाठिंबा दिला. तसेच चौथ्यांदा निवडून आणण्याचा संकल्प सुद्धा यावेळी केला. अंजनगाव बारी सर्कलमधील युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांची बैठकसुद्धा यावेळी घेण्यात आली.यावेळी डॉ. पिसे, नानाजी इंगोले, सुधाकर हटवार, गुड्डू भाऊ आचलिया ज्ञानेश्वर मुळे, विजय पोकळे, जगदीश - अंबाडकार, अशोक तेटू, देवानंद राठोड, - भीमराव हरणे, उद्धवराव कराळे, बंडू - डकरे, दिनेश टेकाम, अजय घुले, संजय - आडे, सरपंच घनशामजी ब्राम्हणे, - अक्षय मेश्राम, सविता काळे, शैलेजा - खंडार, माधुरी मेश्राम, संजय निथनवरे, इंदुताई जवंजाळ, छायाताई आडे, ऑंकार मोहोड, राजेंद्र खंडारे तसेच उपसरपंच अरविंद निंबर्ते, अरुण मडके,

प्रतिभा बनसोड, किशोर राठोड, करुणा भोवते, नारायण मेहंगे, विनोद बांडाबुचे अरुण शाहा, शेरू शाहा, शरद इंगोले, धम्मपाल डोंगरे, रवी डकरे, प्रदीप निच सुनील निचत, रमेश आवलकर, नईम खा, प्रवीण टवलारे, अंकुश मुळे, अशोक बेरड, दिलीप डांगे, दिलीप टरपे, प्रदीप तलवारे यांच्यासह गावातीलनागरिक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३८ उमेदवारांची घोषणा

## अमरावती मधून सौ. सुलभा खोडके यांना उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपल्या ३८ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये सर्वाधिक उत्सुकता होती ती बारामती विधानसभा मतदारसंघाची. आता अजित पवार हेच बारामती विधानसभा मतदारसंघातून एनसीपीचे उमेदवार असतील अशी घोषणा तटकरे यांनी केली. याबरोबरचअमरावती विधानसभा मतदार संघातून सौ. सुलभ खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असे आनंदाचे वातावरण आहे.




राष्ट्रवादीने आपल्या पहिल्याच यादीत आपल्या सर्व ९ मंत्र्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. या मंत्र्यांत अजित पवारांसह, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, आदिती तटकरे, अनिल पाटील, हसन मुश्रीफ, संजय बनसोडे व धर्मरावबाबा आत्राम यांचा समावेश आहे.

अमरावती मध्ये सुलभा खोडके यांना उमेदवारी देण्याच्या आधी काँग्रेस चे माजी उपमहापौर शेख जफर ,व ॲड.शोहेब खान यांनी सुद्धा आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या पक्षात प्रवेश केला त्यामुळे सुलभा खोडके यांची ताकद मतदार संघात अधिक वाढली आहे.

# भाजपाचे माजी आमदार रमेश बुंदिले युवा स्वाभिमानी पक्षात

## युवा स्वाभिमान कडून उतरणार निवडणुकीच्या रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे माजी आमदार रमेश बुंदिले यांनी आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षात बुधवारी दुपारी प्रवेश केला आहे. दर्यापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांना युवा स्वाभिमान उमेदवारी देण्याची शक्यता आहे. भाजपाला हा धक्का मानला जात आहे.



महायुतीतून दर्यापुरातून शिंदे सेनेची माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांना उमेदवारी मिळताच बुंदीले यांनी पक्ष सोडला आहे.

युवा स्वाभिमानी पार्टीच्या कार्यालयात झालेल्या प्रक्ष प्रवेशादरम्यान युवा स्वाभिमान पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. दर्यापूर मेळघाट मतदारसंघ हा युवा स्वाभिमानी पक्षाला द्यावे अशी मागणी आमदार रवी राणा यांनी केली होती. मात्र महायुतीतून उमेदवारी मिळालेली अडसूळ हे रवी राणा यांचे कट्टरवैरी मानले जातात. अडसूळ यांना उमेदवारी मिळताच युवा स्वाभिमानी पक्ष हा दर्यापूर मतदारसंघातून रमेश बुंदिले यांना उभे करणार असल्याचे मानले जात आहे. बाहेरच पार्सल असलेल्या अभिजीत अडसूळ यांना महायुतीतून शिवसेनेने उमेदवारी दिल्याची टीका आमदार रवी राणा यांनी केली आहे. नवनीत राणा खासदारकीला उभ्या असताना अभिजीत अडसूळ यांनी महायुतीचा धर्म पाळला नसल्याचे ते म्हणाले.

# नागपुरात जोड्यांच्या बॉक्समध्ये आढळली बॉम्बसदृश्य वस्तू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

उपराजधानीतील हिंगणा परिसरात रहिवाशी वस्तीमध्ये जोड्यांच्या बॉक्समध्ये बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्याने खळबळ उडाली आहे. याची माहिती मिळताच पोलिसांचे पथक, बॉम्बस्कॉड घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर संबंधित बॉक्सला निर्जन स्थळी नेत त्याची चाचपणी सुरू आहे.




हिंगणा मार्गावरील पार्लेकर ले आऊट परिसरात हा बॉक्स आढळला. तेथील रहिवासी भागात एका घराजवळ हा बॉक्स पडला होता. नागरिकांनी लगेच याची पोलिसांना माहिती दिली. पोलिसांचे पथक तेथे पोहोचले व तातडीने बॉम्बशोधक पथकालादेखील बोलविण्यात आले. बॉम्बशोधक पथकातील कर्मचाऱ्यांनी तो बॉक्स सुरक्षितपणे उचलून पोलिसांच्या गाडीत ठेवला व तेथून तो वानाडोंगरीतील मोकळ्या मैदानात नेण्यात आला. पोलिसांच्या प्रोटोकॉलनुसार आता पथकाकडून तो बॉक्स उघडून त्यातील वायरिंगची तपासणी सुरू असून त्यात विस्फोटक आढळले तर तिथेच त्यांना 'डिफ्युज' करण्यात येईल, अशी माहिती पोलीस उपायुक्त लोहीत मतानी यांनी दिली.

# शहरात विविध साहित्याने सजली बाजारपेठ : दिवाळी आठवडाभरावर

## खरेदीसाठी दुकानांमध्ये वाढली ग्राहकांची रेलचेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

प्रकाशाचे व उत्साहाचे पर्व दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आहे. यानिमित्ताने अमरावती शहरातील मुख्य बाजारपेठ सजली आहे. विविधा साहित्याची रेलचेल दिसून येत असून ग्राहकांची गर्दीही वाढू लागली आहे.



दिवाळी सणानिमित्ताने घराघरांत स्वच्छता सुरू आहे. घराच्या रंगरंगोटीसह सजावटीसाठी नागरिकांनी खरेदी सुरू केली आहे. खरेदीसाठी ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याने व्यावसायिकांना चांगला व्यवसाय होण्याच्या अपेक्षा आहेत. वर्षभरात विविध सण, उत्सव साजरे केले जातात. परंतु, दिवाळी हा सण सर्वधर्मीय मोठ्या उत्साहात साजरा करताना दिसून येतात. त्यामुळे या सणाचे महत्त्व इतरांपेक्षा वेगळे आहे. आबालवृद्धांपासून साऱ्यांना दिवाळी सणाचे विशेष आकर्षण असते,

दिवाळी सण पाच दिवसांचा असतो. प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दिनविशेष असतो. त्यामुळे प्रत्येक दिवसासाठी लागणाऱ्या विविध स्वरूपातील वस्तूखरेदी करण्यासाठी ग्राहकांनी बाजारपेठेत गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. दिवाळी सणासाठीबाजारपेठ बहरल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. प्रकाशाचा झगमगाट करणारे आकाशकंदील, दिवे, पणत्या विविध रंगाच्या रांगोळ्या, फटाके, फुलझडी विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. आकाशकंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मात्र, कागदांच्या वाढत्या किमतीमुळे या वर्षी आकाशकंदील महागले आहेत.

# अर्जात एक चूक पडू शकते महागात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

विधानसभा निवडणुकीतील नामांकन पत्र सादर करताना निवडणूक आयोगाचे नियम पाळणे आवश्यक आहे. अन्यथा नामांकन पत्र अवैध ठरण्याची शक्यता असते. उमेदवार मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असल्यास १ सूचक, अमान्यताप्राप्त पक्ष किंवा अपक्षास १० सूचक आवश्यक आहे.राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी पक्षाने प्राधिकृत केल्याबाबत विहित सूचना पत्र (एबी) अर्जासह सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३ पूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावा, विहित शपथपत्र नमुना २६ मधील सर्व रकाणे भरणे आवश्यक आहे. अचूक व परिपूर्णरीत्या नामनिर्देशनपत्र भरणाऱ्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरतात. चुका असलेले अर्ज रद्द केले जातात.



उमेदवारांचे छायाचित्र कसे असावे ?उमेदवारांनी तीन महिन्यांच्या आतील कालावधीत काढलेले छायाचित्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्जासोबत किंवा छाननीच्या वेळेपूर्वी सादर करावे. छायाचित्राचा आकार २ बाय २.५ असावा, चेहरा समोर, पूर्ण, तसेच डोळे उघडे व मागील बाजू पांढऱ्या रंगाची असावी. छायाचित्र रंगीत किंवा ब्लॅक व व्हॉइट चालेल. उमेदवारांनी सर्वसाधारण कपडे परिधान केलेले असावे, छायाचित्राच्या मागील बाजूला उमेदवाराची किंवा निवडणूक प्रतिनिधींची स्वाक्षरी असावी.

# दिवाळी फराळ परदेशात पाठविण्यासाठी पोस्ट विभाग सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**






परदेशातील नातेवाइकांना दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा म्हणून फराळ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी टपाल विभाग यंदा सज्ज आहे. दिवाळीनिमित्त अमरावती टपाल विभागाने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला आहे. फराळाचे पदार्थ दिल्यानंतर ते नाममात्र किमतीमध्ये पॅकेजिंग करून माफक दरात परदेशात पाठवण्याची सोय केली आहे.

अनेकदा दिवाळीचा फराळ तयार असतो; पण तो पाठविण्याचा मुहूर्त लागत नाही, तसेच अनेक जण दैनंदिन कामातून वेळ काढून टपाल कार्यालयामध्ये येऊ शकत नाहीत,अशा नागरिकांसाठी घरी येऊन फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी पोस्टमन घरी येऊन फराळाच्या पदार्थाचे पार्सल विनामूल्य घेऊन जातील,

नोकरी आणि शिक्षणानिमित्त विदर्भातून परदेशामध्ये जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे.परदेशामध्ये वास्तव्यास असलेल्या प्रत्येकालाच दिवाळीच्या सणासाठी भारतामध्ये येणे शक्य होत नाही. हीबाब ध्यानात घेऊन जगभरातील प्रियजनांना फराळाचे पदार्थ आणि भेटवस्तू पाठवून त्याचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी करण्यासाठी टपाल विभागाने हे पार्सल परदेशात पोहोचवण्याची जबाबदारी उचलली आहे. अमरावती शहरातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये दिवाली फराळ परदेशामध्ये पाठवण्याची सुविधा तसेच तेथे फराळाचे पॅकिंग करण्याची सोयही उपलब्ध आहे.त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन पोस्ट विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आता दोन आठवड्यानंतर वाजेल शाळेची घंटा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

चालू शैक्षणिक वर्षात २७ ऑक्टोबरपर्यंत शाळा सुरू राहणार आहेत. २८ ऑक्टोबरपासून सर्व शाळांना तथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी मिळणार आहे. त्यानंतर माध्यमिकच्या शाळा १२ नोव्हेंबर, तर प्राथमिकच्या शाळा १६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांना तथा शाळांना जवळपास दोन आठवडे दिवाळीच्या सुट्ट्या आहेत. दोन आठवड्यांनंतरच शाळेची घंटा वाजणार



आहे. शहरासह ग्रामीण भागातही काही शाळांमध्ये प्रथम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत आहेत, तर काही शाळांमध्ये दिवाळीची सुट्टी संपताच प्रथम सत्राच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. दिवाळीनंतर होणाऱ्या पहिल्या सत्र परीक्षेपूर्वी शाळांमार्फत विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेण्यात येत आहे. सध्या तोंडी, प्रात्यक्षिक, सराव परीक्षा सुरू आहेत. दिवाळीत विधानसभा निवडणुकीचा प्रचारही होणार असल्याने विद्यार्थ्यांची सुट्टी अन् निवडणुकीची रणधुमाळी असा आनंद घेता येणार आहे.

# प्रशासन अलर्ट, दिवाळी जाणार कर्तव्यातच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

दिवाळी वर्षातील सर्वांत महत्त्वाचा सण. सर्वांना दिवाळीची प्रतीक्षा असते. शासकीय कर्मचाऱ्यांपासून सर्वसामान्य व विद्यार्थ्यांपर्यंत दिवाळीची सर्वांना ओढ असते. दिवाळीच्या दिवसात आनंदाला उधाण येते. मात्र, यंदा ऐन दिवाळीत विधानसभा निवडणूक आली आहे. त्यामुळे प्रशासन अलर्ट असून शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी कर्तव्यावर जाणार आहे.




येत्या १ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाचा मुहूर्त आहे. याचदरम्यान २९ऑक्टोबरपर्यंत विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची धामधूम राहणार आहे. त्यानंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची लगीन घाई सुरू होणार आहे. त्याच दिवशी चिन्ह वाटप झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून प्रचाराची राळ उठणार आहे. ही सर्व कामे ऐन दिवाळीत आल्याने यंदा अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिवाळी मनापासून साजरी करता येणार नाही. सुटीचे दिवस वगळता त्यांना सतत निवडणूक कामात व्यस्त राहावे लागणार आहे.

# कच्च्या मालाच्या दरात वाढ गृहिणींचे बजेट कोलमडले

## शेव, चिवडा, चकली, लाडू, करंजीला महागाईचा तडका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

दिवाळी म्हटली की,कुटुंबातील लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना फराळाची प्रतीक्षा असते. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आल्याने फराळ बनविण्यासाठी गृहिणी, तसेच फराळ विक्रेत्यांची लगबग सुरू झाली आहे. चिवडा, शेव, चकली, विविध प्रकारचे लाडू, शंकरपाळे, करंज्या आदी बनवण्यासाठी गृहिणींनी शनिवार आणि रविवार या सुटीच्या दिवसांचे औचित्य साधून कच्च्या



मालाची खरेदी केली. मात्र, दर वाढल्याने फराळाला महागाईचा तडका बसल्याचे पाहायला मिळत आहे. २८ ऑक्टोबरला वसुबारसपासून दिवाळीला प्रारंभ होणार आहे. त्यामुळे जेमतेम आठ दिवस राहिल्याने फराळबनविण्याचे नियोजन गृहिणींनी केले आहे. त्याकरिता बेसन, तांदळाचे पीठ, साखर, पिठीसाखर, साजूक तूप, तेल, भाजणी, सुकामेवा, सुके खोबरे आदी साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. मात्र, बाजारात या जिन्नसांची मागणी वाढल्याने त्याच्या किमतीही यंदा वाढल्या आहेत. सध्या चणा डाळ, जिरे, धणे, तेल आणि काजू यांच्या दरामध्ये वाढ झाली आहे. यावर्षी पावसामुळे काजूचे दर १५० ते २०० प्रतिकिलो रुपयांनी वाढले आहेत. तेलाच्या दरामध्येही प्रतिलिटरमागे २५ ते ३० रुपयांची वाढ झाली असल्याचे किराणा विक्रेत्यांनी सांगितले. कच्चा माल महागल्याने फराळाचे दर वाढविण्याशिवाय पर्याय नसल्याने फराळ विक्रेत्यांनी सांगितले.

### फराळाचे साहित्य दर – प्रतिकिलो

| | |
|---|---|
| रवा ६० | तेल ८०० |
| मैदा ६० | काजू १४०० |
| साखर ४४ | बदाम ८०० |
| चणा डाळ १४० | फराळाचे पदार्थ दर |
| पातळ पोहे ९० | चकली ३२० |
| बेसन १८० | तिखट शेव ३२० |
| सुके खोबरे २५० | पोहा चिवडा ३२० |
| डालडा १५० | बेसन लाडू (साजूक तुपातील) ५०० |
| तूप ६०० | रवा लाडू ५०० |
| चारोळी ३०० | करंजी ३२० |
| मनुका ५० | शंकरपाळे खारे २४० |
| वेलची ४० | शंकरपाळे गोड २४० |